सोमवार, ७ नोव्हेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ११०
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

धन्यवाद मोदीजी म्हणत नवी मुंबईतून १० हजार पत्र/२

पैठण गोळेगणी परसुले धरणाचे भूमिपूजन/५

वर्ल्डकपमध्ये नेदरलँडकडून द. आफ्रिकेचा पराभव/८

## देशातील पोटनिवडणुकांमध्ये भाजपचा डंका



**नवी दिल्ली :** देशातील सहा राज्यांत सात जागांवर झालेल्या पोटनिवडणुकांचे निकाल रविवारी (दि. ६) जाहीर झाले. यात बिहारमधील दोन आणि महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा, तेलंगणा, ओडिशातील प्रत्येकी एका जागेचा समावेश होता. बिहारमधील गोपालगंज, उत्तर प्रदेशमधील गोला गोकरनाथ आणि हरियाणातील आदमपूरमध्ये भाजपने विजय मिळविला आहे. बिहारच्या मोकामामध्ये आरजेडी आणि महाराष्ट्रातील अंधेरीची जागा उद्धव गटाने जिंकली. अंधेरीत भाजपच्या माघारीमुळे ठाकरे गटाचा विजय ही औपचारिकता होती. तेलंगणातील मुनुगोडेमध्ये टीआरएस, तर ओडिशातील धामनगर जागेवर भाजप आघाडीवर होता. दरम्यान, सध्या गुजरातमध्ये विधानसभा आणि राजधानी दिल्लीत महापालिका निवडणूक होत आहे.

# टीम इंडिया सेमीफायनलमध्ये

## झिम्बाब्वेला सहज नमविले; सूर्या पुन्हा तळपला



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सुपर-१२च्या फेरीत भारताने झिम्बाब्वेविरुद्धचा सामना ७१ धावांनी जिंकत उपांत्य फेरीमध्ये दिमाखात प्रवेश केला आहे. भारताने दिलेले १८७ धावांचे आव्हान झिम्बाब्वेच्या फलंदाजांना झेपले नाही आणि संपूर्ण संघ २० षटकांचा खेळ पूर्ण करण्याआधीच ११५ धावांवर तंबूत परतला.

सामन्यात भारताने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कर्णधार रोहित शर्माने पुन्हा एकदा निराशा केली. तो १५ धावा करून तंबूत परतला. विराट कोहलीही २६ धावा करून बाद झाला, पण केएल राहुलने संयमी फलंदाजी करीत ५१ धावा केल्या. त्यानंतर सूर्यकुमार यादवने अवघ्या २५ चेंडूंमध्ये नाबाद ६१ धावा करीत भारताची धावसंख्या १८६पर्यंत पोहचवली. त्याला हार्दिक पांड्याने १८ धावा करीत साथ दिली.

१८७ धावांचे आव्हान गाठण्यासाठी मैदानात आलेल्या झिम्बाब्वे संघाची सुरुवातच खराब झाली. फलंदाज सिकंदर रझा (३४) याने एकहाती झुंज दिली. त्याला आर. बर्ल (३५) याने साथ दिली, पण अखेर दोघेही संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.

### उपांत्य फेरीत इंग्लंडशी सामना

*झिम्बाब्वेविरुद्धच्या विजयासह भारताने दुसऱ्या गटात अव्वल स्थान कायम राखत प्रवेश केल्याने उपांत्य फेरीत भारतीय संघ इंग्लंडविरोधात १० नोव्हेंबर रोजी मैदानात उतरेल; तर दुसऱ्या गटातील न्यूझीलंड अंतिम सामन्यात प्रवेश करण्यासाठी पाकिस्तानशी दोन हात करणार आहे. भारत, पाकिस्तान जिंकल्यास उभय संघांमध्ये महालढत होईल.*

## मनसे कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत



(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाची कार्यप्रणाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वावर आकर्षित होऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कळंबोलीतील कार्यकर्त्यांनी रविवारी (दि. ६) भाजपमध्ये प्रवेश केला. भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

पनवेल शहर व तालुका भाजप मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमास कळंबोली व्यापारी संघटनेचे अध्यक्ष कमल कोठारी, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, देवांशु प्रभाळे आदी उपस्थित होते.

या वेळी मनसे कार्यकर्ते रामदास जगताप, लक्ष्मण फणसे, सुभाष कंके, शीतल राणे, किरण दळवी, ओमप्रकाश घाटे, मनोजकुमार महाडिक, प्रमोद सावंत, गौतम गायकवाड, रविराज पवार, प्रल्हाद घाणेकर, शिवराम डोंगरे, नारायण नरवडे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

## पनवेलमध्ये 'रोटरी'च्या घनदाट जंगल प्रकल्पाचा प्रारंभ



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी घनदाट जंगल प्रकल्प उभारून वनीकरणाला चालना देण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा प्रारंभ रविवारी (दि. ६) शहरातील लक्ष्मी आय चॅरिटेबल हॉस्पिटलशेजारील नियोजित जागी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, 'रोटरी'चे माजी गर्व्हनर व मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी नगरसेविका चारुशीला घरत, हेमलता म्हात्रे, विद्या गायकवाड, ज्येष्ठ कार्यकर्ते अजय कांडपिळे, रामदास शेवाळे, अर्चना ठाकूर, सुहासिनी केकाणे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, करंजाडेचे माजी सरपंच बळीराम म्हात्रे, सुरेंद्र पाटील, प्रदीप भगत, शिवाजी दुर्गे, गुरूनाथ म्हात्रे, कुणाल घरत यांच्यासह 'रोटरी'चे प्रांतपाल डॉ. अनिल परमार, डॉ. गुणे मॅडम, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, सचिव अनिल ठकेकर, प्रोजेक्ट चेअरमन सुदीप गायकवाड, (पान २ वर..)

### मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण



## निवडक

### अंधेरी पोटनिवडणुकीत ऋतुजा लटके विजयी

**मुंबई :** अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीत उद्धव ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटके विजयी झाल्या आहेत. भाजपने माघार घेतल्याने लटके यांचा विजय निश्चितच मानला जात होता. त्यांना ६६ हजार ५३० मते मिळाली. असे असले तरी या निवडणुकीत 'नोटा' अर्थात यापैकी कुणीही नाही या पर्यायास दुसऱ्या क्रमांकावरील १२ हजार ८०६ मते पडली.

### प्रशांत दामलेंच्या नाट्यप्रयोगाला लाभली बड्या नेत्यांची उपस्थिती

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांच्या 'एका लग्नाची पुढील गोष्ट' या नाटकाचे रेकॉर्डब्रेक १२,५०० प्रयोग पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमास बड्या नेत्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आदींचा समावेश होता. या वेळी मुख्यमंत्र्यांनी, नाट्यगृहांच्या डागडुजीसाठी गरजेचे असेल ते पुरवले जाईल तसेच एक चित्रनगरी उभारणार, असे सांगितले.

## बोरघाटात रिक्षा अपघातात दोघांचा मृत्यू

### दोन जण जखमी




**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर बोरघाटात खोपोलीनजीक टाटा पॉवरच्या सायमाळ वसाहतीजवळील अवघड वळणावर एक रिक्षा समोरून येणाऱ्या खाजगी बसवर धडकली. या अपघातात रिक्षातील दोन प्रवाशांचा मृत्यू आणि दोन जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार लोणावळा येथून किरण वाघमारे याच्या रिक्षेतून (एमएच १४-एचएम ५२९६) रेल्वेचे कर्मचारी शत्रुंजय त्रिपाठी, राघवेंद्र राठोड, कुमार गौरव व सौरव पाठक रविवारी (दि. ६) सकाळी ११च्या सुमारास खोपोलीच्या दिशेने येत होते. ही रिक्षा सायमाळ येथे आली असता चालक किरण वाघमारे याचे रिक्षेवरील नियंत्रण सुटल्याने ती समोरून येणाऱ्या खासगी बसवर (एमएच ०४-जी ९९२५) जाऊन धडकली. हा अपघात इतका भयंकर होता की कुमार गौरव यांच्या डोक्यास गंभीर दुखापत झाली व त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तीन जण जखमी झाले. त्यांना प्रथम चौक येथील रुग्णालयात दाखल केले, मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पनवेल येथील रुग्णालयात हलविण्यात येत असताना वाटेतच शत्रुंजय त्रिपाठी यांचाही मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच आयआरबी यंत्रणा, खोपोली व हायवे पोलीस, त्याचप्रमाणे अपघातग्रस्त मदत पथक घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी मदतकार्य केले. रिक्षाचालक किरण वाघमारे हाही या अपघातात जखमी झाला असून त्याची प्रकृती स्थिर असल्याने त्याच्यावर खोपोली नगर परिषद रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर हेही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमीच्या नातेवाईकांना माहिती कळविली.



## माणगावात जुगार अड्ड्यावर छापा

### ३९ जणांविरुद्ध गुन्हा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा मारला असून ३९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या ठिकाणाहून एक लाख ८५ हजार ३१० रुपयांचा मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला आहे.

माणगाव शहरातील वक्रतुंड हॉटेलमध्ये काही लोक तीन पत्यावर पैसे लावून गैरकायदेशीररित्या जुगार खेळत होते. या ठिकाणी पोलिसांनी शनिवारी (दि. ५) रात्री ८च्या सुमारास छापा टाकला. या प्रकरणी ३९ जुगारींवर महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

## फुटीरतावादी शक्तींना गुजरात नेस्तनाबूत करेल -पंतप्रधान



**वलसाड : वृत्तसंस्था**

गुजरात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रविवारी (दि. ६) गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील कपराडा येथे पहिली रॅली झाली. या वेळी बोलताना त्यांनी गेली २० वर्षे राज्याला बदनाम करण्यात घालवणाऱ्या फुटीरतावादी शक्तींना जनताच नेस्तनाबूत करेल, असे म्हटले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, गुजरातमधील आदिवासी बांधवांच्या आशीर्वादाने मी माझी रॅली सुरू करीत आहे हे माझे भाग्य आहे. यंदाही गुजरात मला जिंकवून विक्रम करणार आहे. या वेळी पंतप्रधानांनी 'मी घडवला हा गुजरात' असा गुजराती भाषेत नवा निवडणूक नारा दिला.

गुजरातच्या तरुणांनी आता कमान हाती घेतली आहे. गुजरातमध्ये द्वेष पसरवणारे कधीच निवडून आलेले नाहीत. काही लोक गुजरातला बदनाम करण्यासाठी आले आहेत. अशा लोकांना गुजरातची जनता धडा शिकवेल, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

दरम्यान, गुजरातमध्ये भाजपने सलग सहा विधानसभा निवडणुका जिंकल्या आहेत. या वेळी गुजरातमध्ये काँग्रेससोबतच आम आदमी पक्षाने निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. असे असले तरी गुजरातमध्ये भाजप सातवा विजय नोंदविण्यासाठी सज्ज होत आहे.

## ताम्हिणी घाट, डोंगरमाथ्यावर धुक्याची दुलई

### प्रवासी, पर्यटक सुखावले



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

हिवाळा सुरू झाल्याने रायगड जिल्ह्यात थंडी आणि धुके जाणवत आहे. डोंगरावर विशेषतः ताम्हिणी घाटात पांढऱ्याशुभ्र व करड्या रंगांचे ढग दाटत आहेत. जणू काही येथे स्वर्गच असल्याचा भास होतो. यातच आजूबाजूला पसरलेल्या गर्द हिरवाईने हा अद्भुत नजारा आणखी बहारदार होतो. त्यामुळे येथून प्रवासी, पर्यटक ढग, हिरवाई, व धुक्याचा आनंद घेत आहेत.

ट्रेकिंग व पर्यटनासाठी सध्या उत्तम वातावरण आहे. त्यामुळे बरेचसे ट्रेकर व पर्यटक किल्ले, डोंगर, समुद्रकिनारा आदी ठिकाणी भटकंती करीत आहेत. ताम्हाणी घाट, वरंध घाट व मोर्बे घाट येथून प्रवास करताना विलक्षण अनुभूती येत आहे. असंख्य पर्यटक येथे आवर्जून थांबून मज्जा लुटताना पहावयास मिळत आहे. शिवाय किल्ले रायगड, सुधागड, सरसगड, मानगड, सुरगड, मृगगड, विश्रामगड, कर्नाळा आदींसह जिल्ह्यातील इतरही उंच किल्ल्यांवर ढग व धुके पसरलेले असते. त्यामुळे येथे येणारे दुर्गप्रेमी व ट्रेकर्स दुर्गभ्रमंतीबरोबरच ढगांची व धुक्याचा अनुभव घेतात.

ताजे व प्रफुल्लीत करणारे हे वातावरण सर्वांनाच आकृष्ट करीत आहे. त्यामुळे जिल्ह्यात पर्यटनवृद्धीसुद्धा होताना दिसत आहे.

> **डोंगरावर पसरलेले ढग व धुक्यामुळे जिल्ह्यातील वातावरण आल्हाददायक झाले आहे. सकाळी या ढगांचा आणि येथील निसर्गसौंदर्याचा पर्यटक मनमुराद आनंद लुटत आहे. ताम्हिणी घाटात उतरलेले ढग व हिरवाई प्रचंड आकर्षित करीत आहे.**
> **-दत्तात्रय दळवी, पर्यटक**

> **अनेक पर्यटक व ट्रेकर खास ढग व धुक्यांचा आस्वाद घेण्यासाठी येत आहेत. धुक्याची व ढगांची चादर सर्वांचे लक्ष वेधून घेते. किल्ले व डोंगरावरील वातावरण अनुभवण्यासाठी असंख्य पर्यटक येत आहेत. शिवाय येथील प्राणीपक्षी व निसर्गसौंदर्याचा आनंद लुटत आहेत.**
> **-उमेश तांबट, संचालक, सुधागड ट्रेकर्स**


## दिग्दर्शक-निर्मात्यांना संभाजीराजेंचा इशारा



**पुणे : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित चित्रपटांमध्ये इतिहासाची मोडतोड करण्यात येत असल्याचा आरोप संभाजीराजे छत्रपती यांनी केला आहे. त्यांनी रविवारी (दि. ६) पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत अभिनेता सुबोध भावेची मुख्य भूमिका असलेला 'हर हर महादेव' आणि महेश मांजरेकर दिग्दर्शित 'वेडात वीर दौडले सात' या चित्रपटांचा उल्लेख करीत इशारा दिला.

छत्रपती शिवाजी महाराज किंवा मावळ्यांवर आधारित चित्रपटात इतिहासाशी छेडछाड केली जाऊ शकत नाही. सिनेमॅटिक लिबर्टीच्या नावे आपण काहीही दाखवत आहोत. इतिहासाचा गाभा सोडता कामा नये. सर्व निर्माते आणि दिग्दर्शकांना सांगू इच्छितो की, जर असेच चित्रपट काढले तर गाठ माझ्याशी आहे. महाराजांचा चुकीचा इतिहास समोर आणत असाल तर याद राखा, असा इशारा संभाजीराजेंनी या वेळी दिला.





## अभिनंदन अन् शुभेच्छा!

**मुंबई : भाजप नेत्या चित्रा वाघ यांची नुकतीच महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अश्विनी पाटील, पनवेल तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी उपमहापौर चारुशिला घरत, जिल्हा उपाध्यक्ष संध्या शारबिंद्रे, मनाली शारबिंद्रे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# किल्ले स्पर्धेत राजे शिवराय प्रतिष्ठान प्रथम

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

(छाया : लक्ष्मण ठाकूर)







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने दीपावलीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नवीन पनवेलच्या राजे शिवराय प्रतिष्ठानने या वर्षीही प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण भाजप पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते हा पारितोषिक वितरण सोहळा झाला.

या स्पर्धेमध्ये एकूण ५५ किल्ले आयोजकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रथम क्रमांक राजे शिवराय प्रतिष्ठान, नवीन पनवेल यांनी मिळविला असून त्यांना १० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. द्वितीय क्रमांक यश पालकर ग्रुप, पनवेल (पारितोषिक सहा हजार रुपये), तृतीय क्रमांक वरद शिरसागर, पनवेल (पारितोषिक चार हजार रुपये) तर १० जण उत्तेजनार्थ काढण्यात आले. त्यांना दोन हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. यासोबतच अन्य १० जण उत्तेजनार्थ काढण्यात आले. त्यांना एक हजार रुपये पारितोषिक देण्यात आले. सर्व सहभागी आयोजकांना सहभाग चषक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अजय बहिरा, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष रोहित जगताप, सरचिटणीस गौरव कांडपिळे, युवा नेता अभिषेक भोपी, कुलवीर चंडिक, विवेक होन, अक्षय सिंग, ओम करमलकर, नूतन पाटील, देवांशू प्रभाळे, शुभम कांबळे, अनिकेत भोईर, प्रणय पाटील, विशांत सापलेया, स्वराज पानरी, सुरज शिंदे, श्रवण घोसाळकर आदी उपस्थित होते.






**पनवेल : तुपगाव (ता. खालापूर) ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदी भाजपचे रवींद्र लक्ष्मण कुंभार नुकतेच निवडून आले. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कुंभार यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी ग्रामपंचायत सदस्य सुयोग भालेकर, सचिन साखरे, निलेश मोरे, कांता नागावकर तसेच विजय ठोसर, केतन साळवी, अमोल गुरव, सचिन साळवी, सदाशिव साळवी, ओमकार भालेकर आदी उपस्थित होते.** (छाया : चेतन पोपेटा, विकास म्हात्रे)

# कोप्रोलीत वाहतूक कोंडीची समस्या

**उरण : वार्ताहर**

उरण पुर्व विभागातील कोप्रोली हे महत्वपूर्ण गाव आहे, मात्र नेहमीच गजबजलेल्या या गावाला अवजड वाहतुकीने बेजार केले असून या वाहतूक कोंडीतून येथील नागरिकांची सुटका तरी कधी होईल, असा प्रश्न येथील जनतेतून विचारला जात आहे. याचा फटका विद्यार्थी, नोकरदार वर्ग ,कामगार या सर्वांना बसत असल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

गोदरा रोडवेजच्या टेम्पोच्या टाकीतील डिझेल संपल्यामुळे शनिवारी (दि. ५) कोप्रोली नाक्यावरच टेम्पो बंद पडला. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. परीणामी अवजड वाहतूक या मार्गावरून न ठेवता यासाठी पर्यायी मार्ग काढण्यात यावा, अशी मागणी येथील जनतेतून होत आहे. वाहतूक शाखेला या संदर्भात राजकीय व सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून वारंवार सूचना केल्या जातात. त्यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस नाक्यावर येऊन रिक्षाचालकांना नियमांचे धडे देऊन निघून जातात.



दरम्यान, वाहतूक कोंडीसंदर्भात वाहतूक शाखेचे नियंत्रण वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि परिसरातील सीएएफसी आणि एमटी यार्डच्या आस्थापनासोबत बैठक घेण्यात आली, मात्र अद्याप वाहतूक कोंडीचे नियोजन झाले नाही. वाहतूक कोंडीची ही गंभीर समस्या सोडविण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.





**कामोठे : विजय शर्मा आणि शैलेश शर्मा यांनी सेक्टर ४ श्री अनिरुद्ध हौसिंग सोसायटी येथे नव्याने स्वर्णा लेडीज ब्युटी पार्लर हा व्यवसाय सुरू केला आहे. या व्यवसायाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी विजय शर्मा व शैलेश शर्मा यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. माजी नगरसेवक विजय चिपळेकर, भाजप कार्यकर्ते प्रदीप भगत आदी उपस्थित होते.**

## निवडक

### अपघातात एक जण ठार, दोघे जखमी

**पनवेल :** उभ्या ट्रेलरला भरधाव वेगाने आलेल्या गाडीची धडक बसली. या अपघातामध्ये एक जण ठार तर दोन जण जखमी झाल्याची घटना पनवेल जवळील टी पॉईंट पळस्पे ते जेएनपीटी महामार्गावर रविवारी (दि. ६) पहाटे घडली. पनवेल जवळील टी पॉईंट पळस्पे ते जेएनपीटी महामार्गावर पहाटे रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रेलरला हुंडाई गाडीवरील चालकाची धडक बसली. झालेल्या अपघातात प्रणव कोळगावकर (वय २५) हा गंभीररित्या जखमी होऊन मयत झाला आहे. तर गाडीतील प्रशांत खाडे (वय २५) व शंतनू पोतदार (वय २४) हे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### उलवे येथून कारची चोरी

**पनवेल :** नव्याने विकसित होत असलेल्या उलवे नोड परिसरातून झेन गाडीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. उलवे सेक्टर २ येथे राहणाऱ्या विवेकानंद मोर्या या तरुणाची झेन कार अज्ञात चोरट्याने राहत्या परिसरातून चोरून नेली. या घटनेची नोंद एनआरआय पोलीस ठाण्यात झाली आहे.

### कळंबोली वसाहतीत रिक्षेची चोरी

**पनवेल :** कळंबोली वसाहतीमध्ये उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. कळंबोलीत राहणाऱ्या सुभाष मुंडोकर नावाच्या रिक्षाचालकाने आपली रिक्षा कळंबोली सेक्टर २ ई येथील परिसरात उभी केली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ही रिक्षा चोरून नेली आहे. या घटनेची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय एकात्मता शिबिर





## विविध उपक्रम आणि पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात २९ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत ८ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन मुंबई 'अ' ग्रुप (8 MAH/BN/NCC/MUMBAI 'A' Group) आणि राष्ट्रीय छात्रसेना संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे (National Integration Camp) आयोजन करण्यात आले होते.

हे शिबिर राष्ट्रीय पातळीवर असून यामध्ये भारतातील महाराष्ट्र आणि ओडीसा राज्यांतील विविध जिल्ह्यातून एनसीसीचे ६५० कॅडेटस सहभागी झाले होते. १० दिवस चालणाऱ्या या शिबिरात रमाकांत नवघरे यांनी सायबर गुन्हेगारी या विषयावर व्याख्यान दिले, व व्यक्तीमत्व विकास या विषयावर डॉ. दिवाकरन पिल्लई यांनी व्याख्यान दिले, याचबरोबर कर्नल नवीन शर्मा यांनी खाकी वर्दी की लष्करी जीवन या विषयावर व्याख्यान दिले, तसेच सैन्यदलातील रोजगाराच्या नवनवीन संधी या विषयावर कर्नल विक्रम सिंग यांनी व्याख्यान देऊन कॅडेटसना मार्गदर्शन केले. मयूर पलांडे आणि त्यांचे सहकारी यांनी स्वसंरक्षण या विषयावर प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. मुंबई दर्शन भेट या उपक्रमा अंतर्गत कॅडेटसनी नेव्हल डॉकयार्ड, गेटवे ऑफ इंडिया, मुंबई विद्यापीठ इत्यादी मुंबईतील प्रसिद्ध ठिकाणांना भेट दिली. या शिबिरात व्हॉलीबॉल, खो-खो, समूहनृत्य, गायन, समुहगायन, राष्ट्रीय एकात्मता स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर इस्पातर्फे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर सुद्धा आयोजित केले होते. सांस्कृतिक कार्यक्रम पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (दि. ५) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या उपस्थितीत झाला. हे शिबिर आयोजित केलयाबद्दल ब्रिगेडियर सी. मधवाल यांनी सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचे सन्मानचिन्ह देऊन आभार मानले आणि कॅम्प कमांडंट, कर्नल नवीन शर्मा यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचेही सन्मानचिन्ह देऊन आभार मानले.

या शिबिरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, कॅप्टन प्रो. डॉ. उद्धव भंडारे, सीटीओ निलीमा तिदार, सर्व शाखा विभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशासाठी बहुमुल्य कार्य केले.

या शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# धाकटे भोम येथे विठू माऊलीचा उत्सव

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील धाकटे भोम येथील श्री विठ्ठल मंदिर कमिटी आणि ग्रामस्थ मंडळ धाकटे भोम यांच्या सहकार्याने प्रबोधिनी कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून श्री विठ्ठल माऊली उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी सकाळपासून दिवसभरात शेकडो भाविकांनी श्री विठू माऊलीचे दर्शन घेतले. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात सकाळी माऊलींचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाआरती करण्यात आली. या वेळी अध्यात्मिक पौर्णिमा मंडळ चिरनेर-भोम यांच्या वतीने पायी दिंडी काढण्यात आली होती. तर विश्वधर्म हरिपाठ वारकरी शिक्षण संस्था वारदोली पनवेल येथील विद्यार्थ्यांनी हरिपाठ केला.



तदनंतर हभप मुक्ताबाई पाटील विश्वधर्म वारकरी शिक्षण संस्था वारदोली पनवेल यांचाही हरिपाठाचा कार्यक्रम झाला. यात गायक बाड आणि गायिका पायल पाटील मृदुंगमणी आर्यन पाटील व श्रीऊ गळवे यांनी आपला सहभाग नोंदविला होता. रात्री नऊ वाजता गावात पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. धाकटे भोमचे प्रयाग मंडप डेकोरेशनचे संचालक राकेश पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

# कामोठ्यात कांदळवन स्वच्छता मोहीम उत्साहात

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर ३६ येथील खाडी परिसरात कांदळवन संरक्षण समिती, कामोठे अणि मन्ग्रोव्ह सोल्जर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ६) सकाळी ७ ते १०च्या दरम्यान कांदळवन स्वच्छता मोहीम झाली.

कांदळवन सरंक्षण समिती अणि मन्ग्रोव्ह सोल्जर ह्यांच्या वतीने जवळ पास ७० स्वयंसेवकांनी आज स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. त्याचबरोबर तेरणा इंजीनियरिंग अणि सरस्वती इंजीनियरिंग कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी, वनविभागाच्या वतीने मंगल ओव्हळ अणि पंचशीला कांबळे (वनरक्षक) अणि पनवेल महापालिकेच्या स्वच्छता विभागाचे कर्मचारी सुद्धा मोहिमेत सहभागी झाले होते.



पर्यावरण संतुलन राखण्यासाठी तसेच खाडी किनारी वसलेल्या शहरांच्या सुरक्षेसाठी कांदळवन वाचवणे फार गरजेचे आहे. कामोठे शहरातील सेक्टर ३६ लगतच्या कांदळवनात मोठ्या प्रमाणात डेब्रिज, घरगुती कचरा टाकल्याचे समितीच्या निदर्शनास आले. ह्यावर वन विभागाकडे तक्रार करताच वन विभागाकडून बांध तोडण्यात आले, परंतु कचरा काही कमी होत नसल्याने स्थानिकांनी मन्ग्रोव्ह सोल्जर संस्थेला स्वच्छता मोहिमेसाठी विनंती केली होती.

स्वच्छता मोहिमेदरम्यान खाडी परिसरातील डेब्रिज, बायो मैडिकल वैस्ट, प्लास्टिक, घरगुती कचरा, निर्माल्य मोठ्या प्रमाणात साफ करण्यात आले. कांदळवन संरक्षणासाठी खाडी परिसरात कचरा न टाकण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात येत आहे तसेच कचरा टाकता येऊ नये म्हणून खाडी लगत सरंक्षक जाळी बसविण्यासाठी समितीच्या वतीने पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा सुरू आहे. तसेच भविष्यात सुद्धा अशा प्रकारच्या स्वच्छता मोहिम घेण्याचे समितीचे नियोजन आहे.

या मोहिमेत माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, धर्मेश बराई, रंजना सडोलीकर, मंगेश अढाव, बापु साळुंखे, स्वप्निल काटकर, भुमी टॉवर सोसायटीचे सेक्रेटरी विलास कलंगे, नीरव नंदोला, जयश्री झा, संगीता पवार, गीता कुडाळकर, शुभांगी खरात, खुशी सावर्डेकर, महेंद्र जाधव, देवानंद बाठे, संदीप इथापे, सुनील आडे, सचिन खरात, शुभम पवार, सत्यविजय तांबे, अशोक जेथे, कामोठे कॉलोनी फोरम, दिशा महिला मंच आदी सामाजिक संस्थांनी सहभाग नोंदवला.

## संपादकीय


# पर्यटन हंगाम जोमात

दिवाळीनंतर पर्यटन हंगामास सुरुवात झालेली असून यंदा सर्व ठिकाणचे निर्बंध कोरोनाच्या दोन वर्षांच्या कालखंडानंतर पूर्णपणे उठले असल्याने पर्यटक खुलेपणाने सैर करतानाचे चित्र पहावयास मिळत आहे. यानिमित्ताने मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होतेय. त्याचबरोबर स्थानिकांनाही चांगल्या प्रमाणात रोजगार मिळत आहे.

**भारतात दिवाळी संपल्यानंतर पर्यटन हंगामाला सुरुवात होते. या काळात बच्चेकंपनीला सुटी असल्याने पालकवर्ग छोट्या-मोठ्या टूर्स करतो. हा पर्यटन हंगाम सर्वसाधारणपणे मुलांच्या परीक्षा सुरू होईपर्यंत म्हणजेच फेब्रुवारीपर्यंत चालतो. या काळात हिवाळा असतो आणि थंडीच्या दिवसांमध्ये वातावरण आल्हाददायक बनलेले असते. त्यामुळे सहलींसाठी या वेळी पसंती दिली जाते. महाराष्ट्रात अनेक पर्यटनस्थळे आहेत. यामध्ये जागतिक दर्जाच्या वास्तू, गड-किल्ले, तीर्थक्षेत्र ठिकाणी लोक जाऊन रिफ्रेश होतात. कोकणात तर फिरण्यासाठी अनेक पर्याय आहेत. निसर्गाला पडलेले सुंदर स्वप्न म्हणजे कोकण. पूर्वेला अथांग अरबी समुद्र... पश्चिमेला सह्याद्रीच्या डोंगररांगा... आणि यांच्यामध्ये असलेला चिंचोळा पट्टा अर्थात कोकण. कोकणातील समुद्रकिनारे सध्या गजबजलेले दिसून येत आहेत. याशिवाय इतरही ठिकाणी गर्दी दिसून येत आहे. मुंबई-पुण्यापासून जवळ असलेल्या रायगड जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे पर्यटकांना साद घालत असतात. तेथे एक-दोन दिवस फिरून पर्यटक ताजेतवाने होऊन परततात. जर चार-पाच दिवस हाती असतील, तर पुढे रत्नागिरी आणि सिंधुदुर्गाची सफर करता येते. कोकणात जसजसे पुढे जाल तसा निसर्ग आणखी खुलत जातो. कोकणात रस्तेमार्गाने जाण्यासाठी मुंबई-पुणे महामार्ग चांगल्या प्रकारे तयार होत आहे. या महामार्गाचे बरेचसे काम पूर्ण होत आले असून येत्या काळात पूर्ण महामार्ग संपूर्ण सज्ज झालेला असेल. याशिवाय रेल्वेमार्गाचाही पर्याय आहे, पण त्यासाठी ठराविक ठिकाणचे प्लॅनिंग करावे लागते. हल्ली समुद्रातून जाण्यासाठी रो-रो, क्रूझसेवाही उपलब्ध झाल्या आहेत. हा प्रवासही आनंददायी ठरतो. कोकणात कसेही जा, तिथे गेल्यावर थकवा निघून जातो हे मात्र नक्की. निसर्गसौंदर्य पाहून मन प्रसन्न होते, तर चविष्ट पदार्थ खाऊन शरीरही खुश होऊन जाते. सध्या कोकणात गावजत्रा आणि विविध महोत्सव आयोजित करण्यात येत आहेत. याचाही आस्वाद पर्यटकांना घेता येणार आहे. उत्तरोत्तर पर्यटन हंगाम बहरणार आहे. डिसेंबरच्या शेवटच्या सप्ताहात ख्रिसमस सण असतो. या काळात गर्दी वाढते. विशेषकरून सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाचे स्वागत करण्यासाठी लोक बेत आखत असतात. एकंदर वैश्विक महामारी कोरोनाच्या दोन वर्षांच्या कालावधीपैकी पहिल्या वर्षी सर्वकाही ठप्प होते. दुसऱ्या वर्षी जनजीवन पूर्वपदावर येऊ लागले, पण अनेक बंधने होती. पर्यटनक्षेत्रही त्याला अपवाद नव्हते. लोक बाहेर पडत होते, मात्र बिचकूनच. यंदा तसे काही नाही. सगळे सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे झाले आहेत. त्यानंतर आता पुढचा काळ हा पर्यटनाचा असणार आहे. त्याकरिता हौशी लोक सज्ज झाले आहेत. काही टूरवर गेले आहेत, तर काही येत्या काळात जातील. त्यांच्या आगमनाने स्थानिकांच्या हाताला काही काळासाठी का होईना, परंतु रोजगार उपलब्ध होईल. त्यामुळे पर्यटनातून मोठी उलाढाल होणार आहे.**

# सद्गुरू वामनरावांच्या जन्मशताब्दीनिमित्त कर्जत भक्तिमय

कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथे सद्गुरू वामनराव पै यांनी जीवनविद्या ज्ञानपीठ उभारले. असंख्य नामधरकांच्या सहकार्याने हे ज्ञानपीठ जीवनविद्या मिशन या नवाने नावारूपास आले. ज्ञानपीठ उभारून कार्याला सुरुवात झाली आणि थोड्याच दिवसात सद्गुरू वामनराव पै स्वर्गवासी झाले. त्यांचे ज्ञानदानाचे कार्य त्यांचे सुपुत्र श्री प्रल्हाददादा पै यांनी सुरू ठेवले. यंदाचे वर्ष म्हणजे २०२२-२३ हे वर्ष सद्गुरू वामनराव पै यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्याचा शुभारंभ नुकताच मागच्या आठवड्यात झाला. या सोहळ्यात सहा दिवसांत हजारो नामधरकांनी उपस्थिती दर्शविली व सद्गुरूंना आदरांजली वाहिली. जीवनविद्या मिशनचे विश्वस्त श्री प्रल्हाददादा पै यांनी तसेच अन्य प्रबोधनकारांनी नामधारकांना प्रवचनाद्वारे प्रबोधन केले. त्यामुळे या सहा दिवसांत कर्जत तालुका भक्तिमय झाला होता.





सद्गुरू वामनराव पै यांचा जन्म मुंबईतील गिरगावातील आंग्रेवाडी मधील एका सर्वसामान्य कुटुंबात २१ ऑक्टोबर १९२२ रोजी बलिप्रतिपदेला झाला. गजानन हे त्यांचे वडील तर राधाबाई या त्यांच्या आई. मॅट्रिकची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी महाविद्यालयिन शिक्षण रुईया महाविद्यालयात कला शाखेत घेतले. १९४४ साली ते कला शाखेचे पदवीधर झाले. त्यानंतर ते मंत्रालयात नोकरीला लागले. १८ मे १९४८ रोजी त्यांचा विवाह गोव्यात स्थायिक असलेल्या विश्वनाथ नेवरेकर यांची कन्या नलिनी यांच्याशी झाला. विवाहानंतर नलिनी शारदामाई झाल्या. वामनरावांनी १९४८ सालीच त्यांनी श्री नानामहाराज श्रीगोंदेकर यांचा अनुग्रह घेतला. प्रपंच सांभाळून त्यांनी आध्यात्मिक साधनाही सुरू केली. हा वारसा त्यांना त्यांच्या आई राधाबाई यांच्याकडून मिळाला होता. 'प्रपंचात राहून परमार्थ सिद्ध करता येतो.' अशी शिकवण देणारे सद्गुरू श्री नानामहाराज यांचे अमूल्य मार्गदर्शन त्यांना मिळाले.

१९५२पासून मुंबईत सद्गुरू श्री वामनराव पै यांचे समाजप्रबोधनाचे कार्य सुरू झाले. सुरुवातीला दादर मधील विवेकानंद स्पिरिच्युअल सेंटर येथे त्यांचे ज्येष्ठ गुरुबंधू परमपूज्य दादासाहेब सबनीस यांची प्रवचने ऐकायला ते जात असत. त्यानंतर वामनरावांनी प्रवचनेही तेथे सुरू झाली. त्यांची प्रवचने व कीर्तने कामगारांच्या आग्रहाखातर चिंचपोकळी, काळाचौकी, लालबाग कामगार विभागात सुरू झाली. मंत्रालयातील नोकरी सांभाळून सायंकाळी ये प्रवचने करीत. कार्यालयातून सायंकाळी घरी आल्यावर थोडीशी विश्रांती घेऊन लगेचच ते प्रवचनस्थळी जायला निघत. स्वखर्चाने ते ट्रेन किंवा बसने प्रवचनाच्या ठिकाणी जात असत.

**खबरबात**
**विजय मांडे**

प्रवचनाला येणाऱ्या साधकांच्या आग्रहाखातर त्यांनी ग्रंथ लेखनास प्रारंभ केला. साध्य जीवनविद्या मिशन अमृतबोलच्या माध्यमातून सद्गुरूंची रेकॉर्ड केलेली प्रवचने-कीर्तने प्रसारित होत आहेत. हजारो लोक त्या मार्गदर्शनाचा लाभ घेत आहेत. त्यांनी कर्जत तालुक्यात वैजनाथ परिसरात जीवनविद्या ज्ञानपीठ उभारले. तेथे अनेक नामधारक येऊन ज्ञान घेत असतात. सामान्य नामधरकापासून ते अगदी बांधकाम व्यावसायिक, उच्चपदस्थ अधिकारी, राजकारणी नामधारकही येथे उपस्थिती दर्शवितात. अनेकांच्या जीवनात सद्गुरुंच्या प्रवचनातून - कीर्तनातून आमूलाग्र बदल झाल्याचा अनुभव नामधारक स्वतःहून सांगत असतात. २१ मे २०१२ रोजी सद्गुरू श्री वामनराव पै देहरूपाने पंचत्वात विलीन झाले, परंतु आजही जीवनविद्येच्या तत्त्वज्ञानावर आधारित त्यांचे ग्रंथ, त्यांची डिजिटल स्वरूपात असलेली कीर्तने, प्रवचने जीवनविद्या फाउंडेशनच्या माध्यमातून अव्याहतपणे सुरू असलेल्या कार्यक्रमांच्या रूपाने ते अजरामर आहेत. त्यांच्या तत्वज्ञानाचा वारसा त्यांचे सुपुत्र श्री प्रल्हाददादा पै अत्यंत विनम्रपणे पुढे नेत आहेत. समाजोपयोगी असे अनेक अभियान ते राबवित आहेत. ग्रामसमृध्दी अभियान, स्वच्छता अभियान, संस्कार शिक्षण अभियान, विद्यार्थी मार्गदर्शन, अवयव दान, व्यसनमुक्ती, स्त्रीसन्मान आदी अभियानांच्या माध्यमातून अनेक अभ्यासू व तज्ञ व्यक्ती एकत्र येऊन श्री प्रल्हाददादांच्या मार्गदर्शनाखाली समाजबांधणीचे कार्य करीत आहेत. परदेशात स्थायिक भारतीय व परदेशातील जीवनविद्येच्या अभ्यासकांसाठी वेबिनर्सद्वारे श्री प्रल्हाददादांचे मार्गदर्शन सुरू असते.

२९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सद्गुरू वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून वैजनाथ येथील जीवनविद्या ज्ञानपीठात 'आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी असंख्य नामधरकांनी उपस्थिती दर्शवून प्रबोधनकार नामधारक तसेच श्री प्रल्हाददादा यांच्या प्रवचनाच्या माध्यमातून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. या सर्व कालावधीत कर्जत तालुका भक्ती रसात डुंबून गेला होता. हे सारे आयोजन करणारे अनुभवी विश्वस्त व विद्यमान विश्वस्त, नामधारक यांनी या सत्कार्याद्वारे सद्गुरु वामनराव पै यांना आदरांजली वाहिली.

# त्रिपुरारी पौर्णिमा

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा त्रिपुरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी शिव मंदिरात त्रिपुर वात (उंच खांबावर असलेल्या दिव्याची वात) लावली जाते. एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो. बौद्ध धर्मात असे मानले जाते की कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी तथागत बुद्धांचा एक पट्टशिष्य धम्म सेनापती सारिपुत्राचे परिनिर्वाण झाले होते. या पौर्णिमेला बौद्ध धर्मीय स्त्री-पुरुष आठ शीलांचे पालन व उपोसथ व्रत करतात. सर्व लहान थोर उपासक-उपासिका एकत्र जमून बुद्ध वंदना घेऊन धम्म उपदेश ग्रहण करतात. शीख धर्मातही या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. शीख धर्माचे संस्थापक गुरू नानकदेव यांची या दिवशी जयंती साजरी केली जाते.

**पौराणिक पार्श्वभूमी**

त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला या वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. त्रिपुरासुराची तीन नगरे असून त्याला अभेद्य तट होता. त्यामुळे देवांनाही त्याचा पराभव करता येईना. देवांनी भगवान शंकराची अखेर प्रार्थना केली. तेव्हा शंकरांनी त्याची तिन्ही नगरे जाळून त्याला ठार केले.७ कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पौर्णिमा म्हटले जाऊ लागले. या दिवशी घरात, घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते तसेच नदीत दीपदान करून लोक आनंदोत्सव साजरा करतात. उत्तर भारतात या दिवशी स्कंद मूर्तीची पूजा करतात. दक्षिणेत या दिवशी कृत्तिका महोत्सव असतो. त्यात शिवपूजन केले जाते. या दिवशी भगवान विष्णू यांनी मत्स्यावतार घेतला अशीही धारणा आहे. या विशेष दिवशी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ भाविक देवाला अर्पण करतात. याला अन्नकोट असे म्हटले जाते. त्रिपुरी पौर्णिमेचे औचित्य साधून मंदिर आणि सार्वजनिक ठिकाणी दीपोत्सव साजरा करण्यात येतो हे या दिवसाचे वैशिष्ट्य सांगता येते. मंदिरांमध्ये असलेल्या दगडी दीपमाळा या संध्याकाळी वाती लावून उजळल्या जातात.१० भाविक भगवान शंकरापुढे त्रिपुर वात लावून उत्सव साजरा करतात.

**(साभार : विकीपीडिया)**




## 'हे' आहेत हानीकारक ॲप; फोनमधून करा अनइन्स्टॉल

ऑनलाइन फसवणूक आणि डेटा चोरीचे प्रकार खूप वाढले आहेत. ऑनलाइन भामटे तुमच्या क्रेडिट, डेबिट कार्डची माहिती चोरण्यासाठी ॲपद्वारे मालव्हेअरचा वापर करत असल्याचेही समोर आले होते. त्यामुळे, खासगी डेटा सुरक्षित ठेवण्याची गरज आहे. सुरक्षित ठिकाणांवरूनच ॲप डाऊनलोड केले पाहिजे.



दरम्यान, गुगल प्ले स्टोअर हे अँड्रॉइड ॲप डाऊनलोड करण्यासाठी सुरक्षित मानले जाते, मात्र तेथेदेखील काही डेटा चोरणारे हानीकारक ॲप आढळले आहेत.

मालव्हेअरबाइट लॅबच्या सुरक्षा तज्ज्ञांनी चार ॲप्सबाबत सावधान केले. हे ॲप्स युजरचा खासगी डेटा चोरत असल्याचे त्यांना लक्षात आले आहे. हे ॲप्स लवकर मोबाइलमधून काढून टाकण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

मालव्हेअरबाइट लॅबच्या सुरक्षा तज्ज्ञांनी चार अँड्रॉइड ॲप्सविषयी माहिती दिली आहे, जे गुगल प्लेस्टोअरवर उपलब्ध होते. प्लेस्टोअरच्या सहायाने हे ॲप अँड्रॉइड ट्रोजन वितरीत करत होते. या चारही ॲपमध्ये Android/Trojan.HiddenAds.BTGTHB ट्रोजन होते. हे ॲप लाखोवेळा डाऊनलोड करण्यात आले आहेत आणि मोबाइल ॲप्स ग्रुप या कंपनीद्वारे बनवण्यात आले आहेत.

**'हे' आहेत ते चार ॲप्स**

१) ब्ल्युटूथ ऑडिओ कनेक्ट
२) ड्रायव्हर : ब्ल्युटूथ, वायफाय, यूएसबी
३) ब्ल्युटूथ ॲप सेंडर
४) मोबाइल ट्रान्सफर : स्मार्ट स्विच

**काय करीत होते हे ॲप्स?**

सुरक्षा तज्ज्ञांनी आपल्या अहवालात सांगितले की, ॲप इन्स्टॉल केल्यानंतर दोन आवड्यांनी हे ॲप मलेशियस वर्तनूक करायचे आणि गुगल क्रोम किंवा मोबाइल ब्राउजर्समध्ये फिशिंग संकेतस्थळ उघडायचे. युजरला सुगावा न लागता ही संकेतस्थळे पे पर क्लिकनुसार कमाई करत होती. डिव्हाइस लॉक असल्यानंतरही क्रोम टॅब बॅकग्राउंडमध्ये ओपन असायचे आणि ॲप आयकन टॅप करताच दिसायचे.

मालव्हेअर असलेले ॲप्स लपूनछपून जाहिरात दाखवत होते आणि युजरला त्यावर टॅप करवून घेत होते. जाहिराती दाखवण्यासाठी युजरच्या डेटाचा वापर होत होता. हा डेटा आधी घेतलेल्या परवानग्यांच्या मदतीने गोळा केला जात होता.

# मराठी कवितेचे प्रणेते केशवसुत

**निमित्त**


केशवसुत यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड या गावी झाला. पण त्याची जन्मतारीख अद्याप १५ मार्च १८६६ किंवा ७ ऑक्टोबर १८६६ आहे की नाही हे चर्चेचा विषय आहे. तथापि, सर्वसाधारणपणे त्यांचा वाढदिवस ७ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. ७ नोव्हेंबर हा त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीची माहिती जाणुया या लेखातून.

केशवसुत यांचे छोटे भाऊ सी. के. दामले यांनी त्यांच्या जीवनावर आधारित चरित्र लिहिले, ज्यामध्ये त्यांनी भाद्रपद कृष्ण १४ रविवारी, शाकी १७८८ सॅन १८६६ म्हणून त्यांच्या जन्मतारखेचा उल्लेख केला आहे. असे म्हणतात की कृष्णपक्षात त्यांचा जन्म झाल्यामुळे त्यांचे नाव कृष्णा ठेवले गेले.

कवी केशवसुत हे मराठी कवितेचे प्रणेते आहेत. एकोणिसाव्या शतकाची मानसिकता त्यांना ठाऊक आणि आत्मसात केली. म्हणूनच त्यांना कवितेचे युग बदलता आले. 'नवीन सैनिक' च्या बाणाने त्यांच्या कवितेने स्वतंत्रता, समानता, क्रांती आणि नवीन आत्म्याचे रणशिंग फुंकले. आधुनिक मराठी कवितांमध्ये केशवसुतान सर्वात पहिले का आहे, पारंपारिक जग उलथून टाकणे आणि त्यांच्याशी समान वागणूक देणे हे त्यांच्या कवितेचे क्षेत्र आहे, असा त्यांचा विश्वास होता. इंग्रजी कविता बघून केशवसुतांनी कवितेची नवीन दृष्टी अंगिकारली आणि मराठीत रुजविली.

महान कवी केशवसुताचे वडील केशव विठ्ठल दामले उर्फ केसोपंत होते, जे सरकार चालवलेल्या मराठी शाळेत शिक्षक होते. आपल्या आरोग्याच्या समस्यांमुळे ते नोकरीपासून लवकर निवृत्त झाले आणि दापोली येथे गेले, जेथे त्याने खोरेगाव (कोकण प्रदेशातील सरंजामशाही व्यवस्थेच्या देखरेखीखाली असलेले खोत किंवा खेडे) असे वाल्णे नावाचे गाव पाहिले. केशवसुतांनी आपल्या 'एक गाव' नावाच्या कवितांमध्ये या गावाचा स्पष्ट उल्लेख केला आहे.

सीके दामले यांनी त्यांच्या चरित्रात असे लिहिले आहे की वल्लने येथील केशवसुताच्या घराला झाडे आणि झाडे यांनी वेढले होते आणि त्या झाडांमधून पडणाऱ्या फुलांनी जमीन भरून गेली होती. घराला वेढणाऱ्या या नैसर्गिक वस्तीला केशवसुत खूप आवडले होते. जेव्हा तो विद्यार्थी होता तेव्हा तो इथे बसायला बराच वेळ घालवायचा. त्यांची छोटी बहीण त्यांना 'टिप फुले, टिप माझे गाडे गा' ही कविता सांगायची. फुलाची पखरण जीप 'येथे आहेत. दुर्दैवाने, शिक्षण पूर्ण केल्यावर, त्याला हवे त्याप्रमाणे निसर्गाच्या जीवनात राहू शकले नाही.



केशवसुतला पाच बहिणी आणि सहा भावांसह ११ भावंडे होती. तो त्यांच्या भावंडांमध्ये पाचवा क्रमांक होता. वडिलांच्या देखरेखीखाली आणि नंतर वडोदरा, वर्धा, नागपूर व पुणे येथे त्यांनी पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. नागपुरात असताना त्यांचे सुप्रसिद्ध कवी नारायण वामनराव टिळक यांच्याशी परिचय झाले. त्यांच्या काव्यात्मक घटकावर नारायण टिळकांचा मोठा प्रभाव होता. त्यांना लहानपणापासूनच कविता लिहिण्याची आवड होती. वयाच्या १४ व्या वर्षी ते १५ अस्खलितपणे श्लोक आणि आर्य लिहू शकले. कवितेबरोबरच त्यांना चित्रकलेचीही आवड होती. जेव्हा ते विद्यार्थी होते, तेव्हा केशवसुतांनी नाटक आणि कादंबरी लिहिली, जी त्याने दक्षिण पुरस्कार समितीकडे पाठविली; पण त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. नंतर त्यांनी आपले जीवन कवितेसाठी वाहिले आणि अनेक सुंदर कविता तयार केल्या. त्यांच्या १३५ कविता अजूनही कविता रसिकांसाठी उपलब्ध आहेत. नवीन कवितेबरोबरच नवीन काव्यात्मक दृष्टीकोन आणि नवीन अभिरुची निर्माण करण्याचीही जबाबदारी नव्या कवींवर पडते.

७ नोव्हेंबर १९०५ रोजी केशवसुत यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्यावर बरेच लेख लिहिले. अनेकांनी त्यांना आधुनिक कवितेचा जनक म्हटले. महाराष्ट्राच्या साहित्यिक जगात केशवसुत यांचे नाव अमर झाले आहे. त्यांचा १००वा वाढदिवस साजरा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक समिती नेमली या समितीने १९६७मध्ये त्यांच्या मूळ हस्तलिखित कामांची आवृत्ती प्रकाशित केली. ८ मे १९९४ रोजी कोकण मराठी साहित्य परिषदेने त्यांचे जन्मस्थान मालगुंड येथे त्यांच्या सन्मानार्थ स्मारक उभारले.

**(साभार : मराठी स्काय)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : अथांग निळाशार समुद्र व किनाऱ्याला असलेली उंच अशी नारळाची झाडे यामुळे कोकणाला मोठे वैभव प्राप्त झाले आहे. उंच अशा नारळाच्या झाडांमध्ये कौलारू घरे आकर्षक दिसतात. कोकणातील हे सौंदर्य पाहण्यासाठी दरवषी लाखोंच्या संख्येने पर्यटक विविध ठिकाणी भेटी देत असतात.** (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

## 'या' लक्षणांमधून ओळखा शरीरातील लोहाची कमतरता

शरीरात लोहाचा अभाव असेल तर ती शरीरासाठी धोक्याची घंटा असते. स्त्रियांमध्ये लोहाची कमतरता असणे सर्वांत सामान्य आहे. पाळीच्या काळात जास्त रक्तस्त्राव झाल्यानंतर अधिक लोहाची गरज भासते. हिमोग्लोबिनचा सर्वांत महत्त्वाचा घटक लोह असतो. तज्ज्ञांच्या सांगण्यानुसार नैसर्गिकरित्या तयार झालेले पदार्थ आणि औषधे यांचे सेवन करून लोहाची कमतरता भरून काढता येते.



लोहाची कमतरता भरून काढताना शरीराला निमियाचा त्रास होऊ शकतो, मात्र अनेक लोकांना याबात वेळीच कळत नाही. तुमच्याही शरीरात लोहाची कमतरता असेल तर त्याच्या सामान्य लक्षणांबद्दल जाणून घ्या.

**सतत थकवा जाणवणे** - कोणत्याही कारणाशिवाय थकवा जाणवत असेल तर हे शरीरात लोहाची कमतरता असल्याचे लक्षण असू शकते. लोहाच्या कमतरतेमुळे हिमोग्लोबिनची निर्मिती होऊ शकत नाही. ज्यामुळे शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा खंडित होऊ लागतो. यामुळे शरीरात ऊर्जा राहत नाही आणि थकवा जाणवतो.

**त्वचा पिवळी पडणे** - जेव्हा आपली त्वचा पिवळी पडल्यासारखी किंवा निस्तेज दिसू लागते, तेव्हा ते लोहाच्या कमतरतेचे एक मोठे लक्षण असू शकते. यामध्ये चेहऱ्यावरून नखांपर्यंत पिवळसरपणा जाणवू लागतो. शरीरात रक्ताच्या कमतरतेमुळे आपली त्वचा पिवळी पडू लागते.

**दम लागणे** - जेव्हा श्वास घेण्यास त्रास होतो तेव्हा ते लोहाच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. शरीरात हिमोग्लोबिनची कमतरता असल्याने स्नायू आणि टिश्यूजपर्यंत ऑक्सिजन पोहोचत नाही, त्यामुळे हा त्रास होतो.

**हृदयाचे ठोके वाढणे** - हृदयाचे ठोके वाढणे हेदेखील लोहाच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असल्यामुळे ऑक्सिजन हृदयापर्यंत योग्य प्रकारे पोहोचत नाही. ज्यामुळे हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात.

**केस आणि त्वचेचे नुकसान होणे** - कोरडी त्वचा आणि खराब झालेल्या केसांव्यतिरिक्त, आपली नखे कोरडी होणे हेही लोहाच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. त्वचा आणि केसांपर्यंत पोषक तत्त्वं पुरेशा प्रमाणात न पोहोचल्याने ही समस्या सुरू होते.

ही अशी काही लक्षणे आहेत, जी शरीरात लोहाच्या कमतरतेमुळे दिसू शकतात. ही चिन्हे वेळीच ओळखून डॉक्टरांचा सल्ला घेणे फायदेशीर ठरू शकते.

# पैठण गोळेगणी परसुले धरणाचे भूमिपूजन





**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडवायला आम्ही आणि इथले कार्यकर्ते तत्परतेने येऊ. धरणासाठी जमिनी देणाऱ्यांच्या मनात मोबदल्याबाबत शंका असणे स्वाभाविक आहे, मात्र जलसंपदा खात्याचे वाटप न झाल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मागण्यांपेक्षाही अधिक मिळवून देण्याची ग्वाही महाड विधानसभा मतदारसंघाचे सदस्य व बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांनी दिली.

## आमदार गोगावले यांचे मागण्यांपेक्षाही अधिक देण्याचे अभिवचन

पैठण गोळेगणी परसुले धरणाचा भूमिपूजन सोहळा रविवारी (दि. ६) आमदार गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी मंगेश साठे, राजिपचे माजी सदस्य चंद्रकांत कळंबे, बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख निलेश अहिरे व संपर्कप्रमुख किशोर जाधव, कृउबा समितीचे संचालक लक्ष्मण मोरे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, सतीश शिंदे, पैठणचे सरपंच संतोष मोरे, गोळेगणी सरपंच नितीन मोरे, परसुले सरपंच सुनंदा कदम, प्रकल्प अधिकारी बाबासाहेब शिंदे आणि ठेकेदार प्रकाश मेंगाणे पाटील आदी उपस्थित होते.

उद्योजक शंकरराव येरूणकर आणि कलावंत संदीप जंगम यांनी धरणबाधितांच्या मागण्यांचे निवेदन आमदार गोगावले यांच्याकडे दिले. पैठण सरपंच संतोष मोरे यांनीही परसुले गोळेगणी पैठणच्या शेतकऱ्यांच्या मागण्यांची रूपरेषा आमदार गोगावले यांच्यासमोर मांडली. या वेळी धरणाबाबतच्या साशंकता दूर झाल्याखेरिज भूमिपूजन नको, अशी भूमिका घेऊन बाधित शेतकरी व ग्रामस्थांनी चर्चा घडवून आणली. सर्वांचे शंकानिरसन करण्यात आमदार गोगावले यांना यश आले.

आमदार गोगावले यांनी, राज्यात मंत्रिमंडळ विस्तारासाठी मुख्यमंत्री शिंदे प्राधान्याने विचार करतील आणि तुमचा लोकप्रतिनिधी मंत्रीमंडळामध्ये स्थान मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी गोळेगणीलगत नदीपात्रात विधीवत पुजनानंतर आमदार गोगावले यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुदळीने भूमिपूजन करण्यात आले. परसुले, गोळेगणी व पैठण येथील बाधित शेतकऱ्यांचा आमदार गोगावले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# पालीच्या अंबा नदीपुलाचे संरक्षक कठडे तुटले



प्लास्टिकच्या पट्ट्या लावून चेष्टा; अपघाताला निमंत्रण

**पाली : प्रतिनिधी**

वाकण-पाली-खोपोली राज्यमहामार्गावरील पाली गावालगत असणाऱ्या अंबा नदीपुलाचे संरक्षक कठडे तुटून नदीत पडल्याने पूल वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. या ठिकाणी प्लास्टिकच्या पट्ट्या लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे जीवघेण्या अपघाताला निमंत्रण मिळत आहे.

वाकण-पाली-खोपोली महामार्ग अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून सद्यस्थितीत या मार्गाची दूरवस्था झाली आहे. या मार्गाचे रुंदीकरणाचे काम संथगतीने सुरू आहे. या मार्गावर जंगली पीरनजीक नदीलगत असलेले संरक्षण कठडे तुटून दोन वर्षांचा काळ उलटून गेला तरी अद्याप नवीन संरक्षक कठडे बसवून रस्ता सुरक्षित करण्यात आलेला नाही. यापूर्वी अंबा नदीपुलावरून झायलो नदीपात्रात कोसळून वृद्ध महिलेला आपले प्राण गमवावे लागले होते. हा पूल जुना झाला असून चहू बाजूंनी मोडकळीस आलेला हा धोकादायक पूल केव्हाही कोसळून मोठी जीवितहानी होण्याची भीती वर्तवली जात आहे.

त्यामुळे पाली पुलासह या मार्गाच्या दुरुस्तीबरोबरच योग्य ती उपाययोजना करण्यात यावी व रस्ता सुरक्षित करण्यात यावा, अशी मागणी जोर धरीत आहे.

# महाडमध्ये भाजप कामगार मोर्चातर्फे धन्यवाद मोदीजी अभियान



**महाड : प्रतिनिधी**

सर्वसामान्यांकरिता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या योजना जाहीर केल्या त्याची अंमलबजावणी केल्यानंतर त्याचा फायदा समाजातील गरिबातील गरीब कुटुंबियांना मिळाला. नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देण्यासाठी भाजपच्या कामगार मोर्चातर्फे महाडमध्ये धन्यवाद मोदीजी अभियान आयोजित करण्यात आले. भाजपच्या कामगार मोर्चातर्फे महाड येथील वेलकम हॉटेलच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या समारंभाला कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश ताठे हे प्रमुख मार्गदर्शक उपस्थित होते.

या वेळी त्यांनी महाड औद्योगिक वसाहतीमधील कामगारांच्या समस्या सोडवण्याची आश्वासन दिले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष बिपिन महामुणकर, तालुका अध्यक्ष जयवंत दळवी, संदीप ठोंबरे, अमोल सुंभे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, महेश शिंदे, श्वेता ताडपळे, कामगार मोर्चाचे दक्षिण रायगड अध्यक्ष रवींद्र पाटील, उपाध्यक्ष हेमंत पाटील, उपाध्यक्ष मनोज धामनसे, तालुकाध्यक्ष योगेश झांजे, पनवेल तालुका अध्यक्ष जितेंद्र निंबाळकर आदी उपस्थित होते.

कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश ताठे यांनी, ई-श्रमकार्ड व इतर लाभार्थ्यांकडून धन्यवाद मोदीजी पोस्ट संकलन करण्यासाठी महाराष्ट्र दौऱ्यांतर्गत महाड येथे अभियानाचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या १५८ योजनांपैकी ३६ योजनांमधून अधिक लाभार्थी आहेत. औद्योगिक वसाहतीमध्ये कामगारांच्या ज्या समस्या आहेत त्या प्राधान्याने सोडवताना महिला कामगारांना योग्य तो न्याय देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कामगारांच्या कायद्यामध्ये काही महत्त्वपूर्ण बदल होणार असून प्रामुख्याने महिला कामगारांना संरक्षित असणारे बदल करण्यात येत असून पुरुषां प्रमाणे महिलांना देखील वेतन व सर्व सोयीसवलती दिल्या जातील.

भाजपचे तालुकाध्यक्ष जयवंत दळवी यांनी, औद्योगिक वसाहतीमध्ये महिला कामगारांना कामावर घेतले जात नसल्याची खंत व्यक्त करून या समस्येकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर म्हणाले, औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षितता नसून अनेक वर्षे एकाच कंपनीत काम करू नये त्यांना कायमस्वरूपी करण्यात आले नाही. या वेळी त्यांनी कामगार मंत्री यांच्याशी भेट घडवून द्यावी त्याचप्रमाणे महाड औद्योगिक वसाहतीतील कामगारांच्या समस्या जाणून घ्याव्या तसेच सोडवण्याकडे अधिक लक्ष द्यावे, अशी विनंती केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार महेश शिंदे यांनी केले.

# स्कॉर्पिओची दोन दुचाकींना धडक; तिघे गंभीर जखमी

**धाटाव : प्रतिनिधी**

कंपनीतील कामगार पहिल्या पाळीसाठी जात असताना रविवारी (दि. ६) रोजी पहाटे ६.३० वा. च्या सुमारास कोलाड बाजूकडून भरधाव वेगाने आलेल्या स्कॉर्पिओवरील चालकाने समोरील दोन दुचाकीस्वारांना जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन कामगार जखमी झाले. त्यात दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने पनवेल येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.



परेश जंगम, दीपेश खांडेकर (रा. मेढे, भिसे) व विवेक मांडलुस्कर (रा. वणी) अशी जखमी कामगारांची नावे आहेत. ते धाटाव एमआयडीसीतील कंपनीत जात असताना रोठ गावातील गंगा नदीवर आल्यावेळी धाटाव बाजूकडून भरधाव वेगाने आलेल्या स्कॉर्पिओने त्यांना जोरदार धडक दिली. यात तिन्ही कामगार जखमी झाले असून त्यांना तातडीने रोह्यातील डॉ. जाधव नर्सिंग होम येथे प्राथमिक उपचाराकरिता नेण्यात आले. त्यापैकी परेश जंगम व दीपेश खांडेकर या दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# मुरूडमध्ये स्त्रीरोग तपासणी शिबिराला उत्तम प्रतिसाद

## २०० महिलांवर अल्पशा दरात उपचार

**मुरुड : प्रतिनिधी**

संजीवनी आरोग्य सेवा व अक्षया पात्रा फाउंडेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील महिलांची श्रीमती अंजलीबाई पुंडलिकराव लहाने डायलेसिस सेंटरला स्त्रीरोग तपासणी व कॅन्सरविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन उद्योगपती महंमद मेनन यांच्या हस्ते करण्यात आले. सोबत संजीवनीचे अध्यक्ष विजय सुर्वे, डायलेसिस सेंटर प्रमुख डॉ. मकबूल कोकाटे, आदेश दांडेकर, कीर्ती शहा, चंद्रकांत अपराध, अजित गुरव, वासंतीताई उमरोटकर, रशीद फहीम आदी उपस्थित होते.

धकाधकीच्या जीवनपद्धतीमुळे महिलांना ब्रेस्ट कॅन्सरला सामोरे जावे लागते. यासाठी महिलांना कॅन्सरविषयी माहिती व हा आजार पूर्णतः बरा होतो, याविषयी मार्गदर्शन नीता मोरे यांनी केले. मुंबईहून आलेल्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रचना मेहरा, सर्जन डॉ. तृप्ती पोयरेकर, डॉ. मीनाक्षी मानकामे, डॉ. मुजाहत मुजावर, मिलन परब आदींनी २०० महिलांची तपासणी केली.

गरजू महिलांना तपासणीसाठी पुढे पाठवण्यात आले. एखाद्या महिलेला आजाराचे निदान झाल्यास संजीवनी सेवा संस्था पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या मार्गदर्शनखाली पुढील उपचार मोफत करण्याबाबत सहकार्य करेल.

# कर्जतमध्ये पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील रॉयल गार्डनच्या सभागृहात रायगड पोलीस दलाच्या वतीने पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबिर उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

या वेळी कर्जत पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे, नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, माथेरानचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, सहाय्यक पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील, सुमित खोत, माधुरी मुळीक आदी उपस्थित होते.



उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी, सराव, गटचर्चा, अभ्यासाचे नियोजन वेळेच्या नियोजनाचा प्रभावी वापर व एकाग्रतेने अभ्यास केल्यास भरती प्रक्रियेत यशस्वी होण्यास अडचण येणार नाही. एक महिनाआधी आम्ही सराव चाचणी व शारीरिक चाचणी घेणार आहोत. त्यासाठी सज्ज रहा, असे आवाहन केले. पोलीस निरीक्षक कोल्हे यांनी, तालुक्यातील जास्तीत जास्त मुले, मुली पोलीस खात्यामध्ये भरती व्हावेत यासाठी हे शिबिर घेण्यात आले आहे. शिबिरातील मार्गदर्शनाने भरतीसाठी सोपे जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

तेंडुलकर यांनी भरती प्रक्रियेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे कोणती याची माहिती दिली. माधुरी मुळीक व उद्धव सुर्वे यांनी लेखी परीक्षेबाबत मार्गदर्शन केले.

# आवासच्या नागेश्वर जत्रेला भाविकांची अलोट गर्दी





**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील आवास गावचे नागेश्वर देवस्थानच्या जत्रेला भाविकांनी रविवारी (दि. ६) अलोट गर्दी केली होती. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांत या देवस्थानाचा जत्रोत्सव होऊ शकला नाही, परंतु रविवारी झालेल्या जत्रोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळाला.

दरवर्षी वैकुंठ चतुर्दशीला नागेश्वराचा उत्सव साजरा होतो. उत्सवात पहाटे नागोबा मंदिरात धार्मिक विधी पार पडतात आणि त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले केले जाते. या वर्षी कोरोनाच्या नियमांचे कोणतेच बंधन नसल्याने सकाळपासून नागेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी पहायला मिळाली. या देवस्थानाला मानणारा भाविक केवळ पंचक्रोशीतीलच नव्हे तर जिल्ह्यातील आणि जिल्ह्याबाहेरील देखील आहे. जत्रोत्सवाच्या निमित्ताने मुंबई, पुणे, ठाणे येथून भाविक आज दर्शनासाठी आले होते.

पावसाळा संपल्यानंतर तालुक्यातील पहिला मोठा जत्रोत्सव म्हणून या आवासच्या जत्रेकडे पाहिले जाते. या जत्रेला पूर्वीपासून दूरदूरच्या गावचे लोक बैलगाडीमधून येत आहेत. खासगी वाहने असतानाही बैलगाडीची मजा काही औरच! तो आनंद घेण्यासाठी अगदी मुरुड तालुक्यातील भाविक बैलगाडीने जत्रेला येतात. आजही ती परंपरा कायम असल्याचे पहायला मिळाले. चोंढी, झिराड मार्गावर बैलगाड्या लक्ष वेधून घेत होत्या.

जत्रेच्या निमित्ताने अलिबाग एसटी आगारातून विशेष गाड्या सोडण्यात आल्या होत्या. अलिबाग-चोंढी-आवास आणि लोणघर-आवास जत्रा विशेष अशी एसटीची सेवा होती. दोन वर्षाच्या कोरोनाच्या महामारीतून बाहेर आल्यानंतर रविवारी भरलेली आवसची जत्रा आर्थिक, मानसिक, मरगळ दूर करणारी ठरली.

### झिराड-आवास फाट्यावर पाण्याची सुविधा उपलब्ध

सामाजिक संस्थांच्या माध्यमातून जत्रेसाठी येणाऱ्या भाविकांची तहान भागविण्यासाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा देण्यात आली होती. राजकीय आणि सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी भाविकांची केलेली सोय कौतुकाचा विषय बनली होती.

### ग्रामपंचायतीकडूनही नागरिकांसाठी सुविधा

आवास ग्रामपंचायत दरवर्षी जत्रोत्सवात दुकानदार आणि भाविकांना सुविधा पुरवित असते. या वर्षीदेखील पाणी, वीज आणि तत्सम सुविधा देण्यात आली होती. विशेष म्हणजे रविवार असल्याने जत्रा सकाळपासून भरली होती. विविध प्रकारच्या खाद्य पदार्थ, खेळणी, पाळणे यामुळे यंदा जत्रा लक्ष वेधून घेत होती.

# नेरळमधील माजी विद्यार्थी १८ वर्षांनी आले एकत्र



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील विद्याविकास मंदिरमध्ये माध्यमिक शिक्षण घेणारे आणि नेरळ विद्यामंदिर शाळेत उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी १८ वर्षांनी एकत्र येत स्नेहसंमेलन साजरे केले. या वेळी दोन्ही शाळांचे शिक्षक वर्गदेखील उपस्थित होते.

नेरळ गावातील विद्याविकास मंदिर शाळेत ७ वीपर्यंत आणि नंतर नेरळ विद्यामंदिर या ठिकाणी १० वीपर्यंतच्या १५०हून अधिक विद्यार्थ्यांनी आपल्या सवंगडींना एकत्र केले. या वेळी दोन्ही शाळांचे एकूण दहा शिक्षक, माजी विद्यार्थी मेळाव्यात सहभागी झाले होते. त्यात विद्याविकास मंदिरच्या माजी पर्यवेक्षिका प्रज्ञा सोमणी, माजी मुख्याध्यापिका आसावरी काळे, पर्यवेक्षिका अरूणा जोगळेकर, विद्यमान मुख्यध्यापिका शैलजा निकम तर नेरळ विद्यामंदिरचे माजी मुख्याध्यापक प्रकाश राठोड, ए. बी. चौधरी, वालवडकर, ए. टी. पाटील, म्हात्रे आणि सुनील गायकवाड आदी शिक्षक यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सर्व विद्यार्थ्यांनी शाळेतल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनी दिलेले फटके तसेच वर्गात केलेली मजा मस्ती हे सगळे किस्से विद्यार्थ्यांनी सांगितले. सर्वांनाच १८ वर्षांनी एकत्र भेटीचा योग आणण्याची जबाबदारी माजी विद्यार्थी कमलेश कवाडकर, शीतल पटवर्धन, संदीप तरे, भूषण जाधव, तन्वी भवारे, निलेश विरले, श्रीहरी काळे, सागर खानिकर, विक्रांत भवार यांनी मेहनत घेतली.

# वीट व्यावसायिकांची कसरत

## जमिनीत अद्याप ओलावा असल्याने अडचण

**पनवेल, उरण : रामप्रहर वृत्त**

पनवेल व उरण तालुक्यात परतीच्या पावसाने भातपिकाचे प्रचंड नुकसान झाले असून उशिरापर्यंत पाऊस पडत राहिल्याने अजून जमिनीत ओलावा आहे. याचा फटका तालुक्यातील इतर व्यवसायाबरोबरच वीट व्यावसायिकांनादेखील बसला आहे. साधारण दसरा झाल्यानंतर वीट व्यावसायिक हा व्यवसाय करण्यास सुरुवात करतात, यंदा मात्र पावसामुळे अद्याप जमिनीत ओलावा तर काही भागात पाणी असल्याने हा व्यवसायच अजून सुरू करता आलेला नाही. त्यामुळे वीट व्यावसायिक अडचणीत आले आहेत.



रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील भातशेती व्यवसायाला पूरक व्यवसाय म्हणून काही शेतकरी आणि बेरोजगार तरुण वीट व्यवसाय करतात; मात्र यंदा उशिरापर्यंत परतीचा पाऊस पडल्याने जमिनीत अद्यापही ओलावा आहे. यामुळे वीट उत्पादन सुरू करता येत नाही. अनेक वीट उत्पादक हे एप्रिल, मे महिन्यानंतर मजुरांना आगाऊ रक्कम देऊन वीट तयार करण्यासाठी मजूर नियुक्त करून ठेवतात. ग्रामीण भागात याला 'पातले' असे संबोधतात. यात नवरा-बायको, त्यांची मुले यांना अन्न-धान्य पुरविणे यासाठी अगोदर खर्च करावा लागतो.

तसेच मातीच्या विटासाठी तूस, कोळसा, लाल माती, पाण्याची व्यवस्था आदी बाबींसाठी गुंतवणूक करावी लागते. मात्र पावसामुळे अद्याप वीट उत्पादन सुरू न केल्याने व्यावसायिकांना पुन्हा पुन्हा मजुरांना पैसे द्यावे लागत आहेत. दसरा, दिवाळीला व्यवसाय सुरू केल्यानंतर आतापर्यंत व्यावसायिकांच्या हातात पैसे येण्यास सुरुवात होते, पण अजूनही उत्पादन सुरू न झाल्याने व्यावसायिकांची अडचण वाढली असून यंदाच्या वर्षी उशीर झाल्याने वीट उत्पादन घटणार आहे.

रायगड जिल्हातील पनवेल, उरण तालुक्यातील काही दुर्गम भागात वीट उत्पादनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. हा व्यवसाय करणारे साधारण एक ते दीड हजार वीट व्यावसायिक असून दरवर्षी हजारो कुटुंबे या व्यवसायातून आपला उदरनिर्वाह करतात. येथील विटांना वसई, मुंबई, ठाणे शहरातून, तसेच ग्रामीण भागातही औद्योगिकीकरणामुळे चांगली मागणी आहे, मात्र सध्या वीट व्यावसायिक अडचणीत सापडले आहेत.

यंदा पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक राहिले आहे. वरुणराजा सातत्याने पडत होता. त्यातच मान्सून लांबला. त्यामुळे ज्याप्रमाणे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्याचप्रमाणे वीटभट्टी व्यावसायिकांनाही फटका बसला आहे. अजूनही मातीतल ओलावा असल्याने हे व्यावसायिक हवालदिल झाले आहेत.

**सध्या सिमेंटच्या विटा बनविण्याचे काम सुरू झाल्याने, तसेच या विटा बनविण्याची यंत्रे उपलब्ध आहेत. मातीच्या विटांपेक्षा सिमेंटच्या विटा स्वस्त असल्याने त्यांना मागणी जास्त आहे. तसेच मातीच्या विटा बनविण्यास मेहनत व खर्चसुद्धा जास्त होत असल्याने वीट व्यावसायिक संकटात सापडले आहेत.**

**-संतोष देशमुख, वीट व्यावसायिक**

**आम्ही विटा तयार करण्याचे काम करून आपले पोट भरतो. यावर्षी अजून नीट वीट व्यवसायाला सुरुवात झालेली नाही. पैसे आगाऊ घेतलेले असल्याने दुसरीकडे कुठे कामाला जाऊ शकत नाही. त्यामुळे लवकर या कामाला सुरुवात झाली तर पोटापाण्याचा प्रश्न सुटेल.**

**-सुरेश लीलका, वीट कामगार**

# मुले चोरणारे समजून तिघांना मारहाण

## तळोजामधील घटना

**पनवेल : वार्ताहर**

मुले चोरण्यासाठी आल्याचे समजुन तळोजा गावात राहणाऱ्या पाच ते सहा व्यक्तींनी एका रिक्षा चालकाला व दोन तरुणींना बेदम मारहाण केल्याची घटना तळोजा येथे घडली. या मारहाणीत रिक्षा चालक जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेनंतर तळोजा पोलिसांनी पाच ते सहा अज्ञात व्यक्तीविरोधात मारहाणीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेत जखमी झालेल्या रिक्षा चालकाचे नाव महम्मद गुलमोहम्मद शकील अन्सारी (वय २४) असे असून तो शिळफाटा येथील झोपडपट्टीत आपल्या कुटुंबासह राहण्यास आहे. महम्मद अन्सारी हा भाड्याने रिक्षा चालवुन आपल्य कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. मोहम्मद अन्सारी हा प्रवासी घेऊन कळंबोली येथे गेला होता. त्यानंतर तो पुन्हा शिळफाटा येथे प्रवासी घेऊन जाण्यास निघाला होता. तळोजा गाव येथे दोन महिला प्रवाशांना सोडल्यानंतर महम्मद अन्सारी याला शिळफाटा येथे राहणाऱ्या त्याच्या ओळखीतील दोन तरुणी निदर्शनास आल्या. त्यामुळे महम्मद अन्सारी हा त्या तरुणींकडे विचारपुस करत असतानाच त्यांच्या पाठीमागून आलेल्या चार ते पाच व्यक्तींनी या तरुणी मुले चोरण्यासाठी आल्याचे सांगत त्यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे रिक्षाचालक महम्मद अन्सारी याने त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता, मारहाण करणाऱ्या व्यक्तींनी तोदेखील मुले चोरण्यासाठी आल्याचे सांगत त्यालादेखील लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहून त्या भागात असलेल्या इतर नागरिकांनी महम्मद अन्सारी हा मुले चोरणाऱ्या टोळीतील सदस्य असल्याचे सांगत त्याला मारहाण करत त्याच्या रिक्षाची तोडफोड केली.

या घटनेची माहिती मिळताच तळोजा पोलिसांनी त्या ठिकाणी धाव घेऊन रिक्षाचालक महम्मद अन्सारी याची मारहाण करणाऱ्या लोकांच्या तावडीतून सोडवणुक केली. या मारहाणीत रिक्षा चालक जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात पाठवुन दिले.

# सीकेटी विद्यालयात आपण घडवूया आपले जीवन विषयावर व्याख्यानमाला

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत शनिवारी (दि. ५) व्याख्यानमाला पुष्प तिसरे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी मा. रोहिदास पोटे सेवानिवृत्त शिक्षण सहसंचालक महाराष्ट्र राज्य पुणे हे प्रमुख व्याख्याते म्हणून लाभले होते. आपण घडवूया आपले जीवन या विषयावर व्याख्यात्यांनी अतिशय सुंदर व्याख्यान सादर केले. आपल्या व्याख्यानात त्यांनी आपले जीवन घडविणारे अनेक सुंदर विचार मांडले. जीवनात संघर्ष केल्याशिवाय यश मिळत नाही, जीवनात वेळेचे महत्व पटवून देताना त्यांनी सांगितले की वेळ आणि समुद्राच्या लाटा कुणाचीही वाट पाहत नाहीत. जीवनात आलेली संधी कधीच सोडायची नाही, आपल्या हातात काय आहे तर सर्वात प्रथम आपल्या आयुष्याचा विचार करायचा, जीवनात अशक्य असं काहीच नाही यश मिळवण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येकाने जीवनात ध्येय ठेवले पाहिजे मला काहीतरी करायचे आहे हे पक्के करून सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी या वयात पैशांच्या किंवा संपत्तीच्या मागे न लागता माणसं जोडायला शिकलं पाहिजे व मी कोण आहे ते ओळखून आपला योग्य रस्ता निवडला पाहिजे व आपलं आदर्शवत जीवन घडविले पाहिजे.

या व्याख्यानासाठी उच्च माध्यमिक वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक मा. प्रशांत मोरे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना समिती सदस्य संगीता देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. कार्यक्रमाचे संपूर्ण निवेदन ध्वनी सावंत या विद्यार्थिनीने केले. एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील व गणेश पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वैष्णवी राठोड या विद्यार्थिनीने आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



# नवी मुंबईत फ्लेमिंगोंचे उशिराने आगमन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी हिवाळ्याच्या ऋतूमध्ये साधारणपणे ऑक्टोबर अखेरीस व नोव्हेंबर ते डिसेंबरपर्यंत फ्लेमिंगो पक्षांचे मोठ्या प्रमाणात आगमन होत असते. त्यांचा अधिवास साधारणत: तीन ते चार महिन्यांचा असतो, मात्र यंदा ऑक्टोबरपर्यंत मान्सून सुरू होता. त्यामुळे हिवाळा लांबल्याने आद्यप नवी मुंबई शहरात फ्लेमिंगोचे स्थलांतर होण्यास सुरुवात झाली नाही. ऐरोली-ठाणे खाडी किनारी २० नोव्हेंबरपर्यंत फ्लेमिंगोचे आगमन सुरू होईल, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.



फ्लेमिंगो म्हणजे रोहित पक्षी हे इराण, अफगाणिस्तान आणि इस्त्रायलमधून भारतातील विविध पाणथळ क्षेत्रात हिवाळ्यादरम्यान येत असतात. गुजरातच्या कच्चमधून हजारो किमीचा प्रवास करून हे परदेशी पक्षी समुद्रकिनारी किंवा पाणथळ भागात येत असतात. तसेच नोव्हेंबर ते जास्तीत जास्त जून महिन्यापर्यत वास्तव्यास असतात. त्यांचा मुक्काम कच्छ व्यतिरिक्त माहूल-शिवडी, नवी मुंबईत असतो. ऑक्टोबर अखेरीस किंवा नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच फ्लेमिंगो आगमनाची सुरुवात होते. मात्र ऑक्टोबर पर्यंत मान्सून लांबला होता. नवी मुंबई शहरात म्हणावी तशी थंडीची चाहूल लागली नाही ,त्यामुळे पक्षीप्रेमी फ्लेमिंगो अधिवासाच्या प्रतीक्षेत आहे. नवी मुंबई शहरात नेरूळ, उरण तसेच ऐरोली- ठाणे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर फ्लेमिंगोचे दर्शन होत असते. फ्लेमिंगोच्या आगमनाची चाहूल लागताच पर्यटक, पक्षीप्रेमी यांच्या फ्लेमिंगो पाहण्यासाठी नजरा लागतात. ऐरोली येथील सागरी जैवविविधता केंद्रात विशेषता या परदेशी पाहुण्यांना जवळून पाहता यावे याकरिता बोटिंग सफर सुरू असते. मात्र अद्याप त्या ठिकाणी या परदेशी पाहुण्यांचे आगमन झाले नसल्याने ही बोटिंग सफर आहे बंद आहे.

यावर्षी उशिरा आगमन होईल अशी शक्यता पक्षीप्रेमी अभ्यासक यांच्याकडून वर्तविण्यात येत आहे. यंदा मान्सून उशिरापर्यंत सुरू होता. वातावरणात उष्ण दमट हवामान होते. त्यामुळे रोहित पक्षांसाठी असलेली पोषक वातावरणनिर्मिती आद्यप सुरू झाली नसून थंडीची सुरुवात होताच, शहरात फ्लेमिंगो दाखल होण्यास सुरुवात होईल असा अंदाज पक्षीप्रेमी लावत आहेत.

'बीएचएनएस'च्या वतीने मुंबईत हिवाळ्यादरम्यान स्थलांतरीत होणाऱ्या पाहुण्या पक्ष्यांच्या हालचालींवर देखरेख ठेवण्यासाठी त्यांना जीपीएस सॅटेलाईट-टॅग केले आहे. यामध्ये एकूण ६ फ्लेमिंगोना जीपीएस सॅटेलाईट-टॅगिंग केले असून वाशीती ज्या फ्लेमिंगोला जीपीएस टॅगिंग केले होते त्याला नवी मुंबई फ्लेमिंगो असे नाव ही देण्यात आले आहे. मात्र सर्व टॅग केलेले पक्षी कच्छ मध्ये गेले आहेत. त्यामुळे जीपीएस सिग्नल रेंजच्या बाहेर गेले असल्याने बीएनएचएस आता स्थलांतरित पक्ष्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून आहे.

# नवघर येथे गौरव महाराष्ट्राचा कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

नवघर येथे शनिवारी (दि. ५) श्री विठ्ठल रखुमाई पालखीनिमित्त भाजप नेते सुधीर घरत व वरद घरत यांच्याकडून कला सागर प्रस्तुत गौरव महाराष्ट्राचा हा कार्यक्रम झाला.

या वेळी वरिष्ठ नेते दौलतशेठ घरत, सुधीर घरत, रवीशेठ वाजेकर, माजी सरपंच शेखर तांडेल, विजय भोईर, सुरेश तांडेल, योगेश तांडेल, ग्रामपंचायत सदस्य गणेश वाजेकर, भूपेंद्र कडू, हितेश भोईर, मयुरी पाटील, दमयंती पाटील, प्रीती पाटील आदी उपस्थित होते.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल रखुमाई पालखी सोहळा नवघर अध्यक्ष समाधान तांडेल, कार्याध्यक्ष राजेश पाटील, उपाध्यक्ष अमित जोशी, सेक्रेटरी राजेश कडू, सहसेक्रेटरी कल्पेश जोशी, खजिनदार अजय भोईर, जयप्रकाश पाटील, योगेश तांडेल, धर्मेंद्र तांडेल, कुंदन कडू, जयप्रकाश भोईर, ज्ञानेश्वर भोईर, नवेल तांडेल, रोशन भोईर, रूपेश भोईर आदींसह ग्रामस्थांनी मेहनत घेतली.

## त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त पनवेलमध्ये दीपोत्सव



**पनवेल : वार्ताहर**

श्री रामेश्वर महादेव देवस्थान व जाणीव एक सामाजिक संस्था पनवेल यांच्या वतीने त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव कार्यक्रम श्री रामेश्वर महादेव मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सोमवारी (दि. ७) सायंकाळी ६ वाजता शहरातील श्री रामेश्वर महादेव मंदिर,वीर सावरकर चौक पनवेल येथे दीपोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पनवेलकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजक श्री रामेश्वर महादेव देवस्थान अध्यक्ष उमेश इनामदार व जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक नितीन पाटील यांनी केले आहे.

# उरणमध्ये कातकरी वाड्यांवर जातीच्या दाखल्यांचे वाटप

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील अनेक कातकरी वाड्यावर शनिवारी (दि. ५) उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जातीच्या दाखल्यांचे वाटप झाले.

रायगड जिल्हाधिकारी तथा प्रभारी कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे आणि त्यांच्या इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने डुंबा ची कातकरीवाडी जासई, कोल्हापूर कातकरीवाडी चानजे, लिंबाची कातकरीवाडी, डावूर नगर कातकरीवाडी उरण येथील कातकरी बांधवांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले.



या वेळी संतोष घरत, दत्ता गोंधळी, नामदेव ठाकूर, आदिवासी प्रतिनिधी मनीष कातकरी आदी उपस्थित होते. जातीचे दाखले वाटप केल्यानंतर कातकरी बांधवांच्या चेहऱ्यावर अनमोल आनंद झळकत होता. उरण सामाजिक संस्थेने आदिवासी कातकरी बांधवांसाठी मागील दोन वर्षांत केलेले काम पाहून जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी उरण सामाजिक संस्था व असे काम करणाऱ्या अन्य सामाजिक संस्थांच्या सहकार्याने जिल्ह्यातील प्रत्येक आदिवासी वाडीवर जातीचे तसेच अन्य शासकीय दाखले वाटप शिबिरे घेण्याचे निर्देश सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.

कातकरी बांधवांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याच्या या प्रयत्नांबद्दल प्रा. राजेंद्र मढवी यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी, तहसीलदार आणि सर्व मंडळ अधिकारी, आदिवासी विकास निरीक्षक, तलाठी, महसूल विभागातील इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आभार मानले.


# उरणच्या खाडीकिनारी मुक्तसंचार

**उरण : प्रतिनिधी**

देश विदेशातील फ्लेमिंगो पक्ष्यांबरोबर इतर विविध जातींच्या पक्षांनी आपला मोर्चा उरण तालुक्यील पाणजे, नवीन शेवा, भेंडखळ ग्रामपंचायत परिसरातील पाणथळ जागांवर वळविला असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

फ्लेमिंगो पक्षी हे अफगाणिस्तान, इराण, इस्त्रायलमधून मोठ्या संख्येने देशातील विविध पाणथळ जागांवर हिवाळ्याच्या दिवसांत दरवर्षी येतात. त्यातील बरेचसे फ्लेमिंगो पक्ष्यांबरोबर इतर विविध जातींचे पक्षी हे हजारो मीटरचा प्रवास करत नवीमुंबई व उरणच्या पाणथळ जागांवर येतात, परंतु या परिसराचा कायापालट झपाट्याने होत असल्याने पाणथळ जागांचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे हिवाळ्याच्या दिवसांत जेएनपीटी बंदराच्या परिसरात मोठ्या संख्येने आढळून येत असलेल्या फ्लेमिंगोच्या संख्येत घट होत असल्याचे दिसून येत आहे.

सध्या उरण तालुक्यातील नवीनशेवा व भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील पाणथळ जागांवर फ्लेमिंगो पक्ष्यांबरोबर इतर विविध जातींच्या पक्षांची रेलचेल सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. एकंदरीत अशा फ्लेमिंगो इतर विविध जातींच्या पक्षांच्या मुक्त संचारामुळे पक्षी प्रेमींना पर्वणी ठरत आहे.



# नांदगाव आरोग्य केंद्र सलाईनवर

## डॉक्टर उपलब्ध नसल्याने स्थानिक ग्रामस्थांची नाराजी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीमधील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे मागील काही महिन्यांपासून डॉक्टर उपलब्ध नसल्याने येथील ग्रामस्थांचे मोठे हाल झाले आहेत.




सध्या मुरुड तालुक्यात थंडी तसेच भातकापणीचा हंगाम सुरू आहे. अशावेळी सर्पदंश अथवा विंचूदंश होणे असे अनेक प्रकार घडतात, तसेच थंडीमुळे आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत, परंतु गेल्या अनेक दिवसांपासून येथे डॉक्टर उपलब्ध होत नसल्याने नागरिकांचे खूप हाल होत आहेत. नांदगाव ग्रामपंचायतीची लोकसंख्या पाच हजार तर याच पार्थमिक आरोग्य केंद्राला संलग्न असणाऱ्या उसरोली ग्रामपंचायत, मजगाव ग्रामपंचायत, वेळास्ते ग्रामपंचायत व आजूबाजूची गावांची लोकसंख्या ही २० ते २५ हजरांपेक्षा जास्त असून या सर्व ग्रामपंचायतींना एकमेव आधार या आरोग्य केंद्राचा आहे, परंतु डॉक्टर उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

याबाबत नांदगाव ग्रामपंचायतीचे सदस्य सचिन पाटील यांनी सांगितले की, येथे डॉक्टर उपलब्ध व्हावा यासाठी मुरूड गटविकास अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधला आहे. त्याचप्रमाणे कार्यरत लोकप्रतिनिधींनासुद्धा डॉक्टर उपलब्ध होण्यासाठी ग्रामस्थांच्या वतीने प्रयत्न सुरू आहेत. चार ग्रामपंचायतीसाठी एक आरोग्य केंद्र असूनसुद्धा एक डॉक्टर उपलब्ध होत नसेल तर ही शोकांतिका आहे. नांदगाव केंद्राला लवकरत लवकर डॉक्टर उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### नवीन नियुक्ती नाही

**या आरोग्य केंद्रात डॉ. कबले हे कार्यरत होते, परंतु त्यांचा कार्यकाळ संपल्याने ते येथून निघून गेले. तेव्हापासून येथे डॉक्टर न देण्यात आल्याने येथील लोकांना आरोग्य सुविधेसाठी झगडावे लागत आहे.**

# रेवदंडा समुद्रकिनारी जाणाऱ्या रस्त्यावर कोंडी

## मच्छीविक्रेते रस्त्यात, वाहनांना अडथळा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्रकिनारी सध्या पर्यटकांची मोठी रेलचेल आहे, परंतु समुद्रकिनारी जा-ये करण्यासाठी असलेल्या हायस्कूलनजीकच्या मार्गात मच्छीविक्रेते व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी निर्माण होते.

रेवदंडा हायस्कूलनजीकच्या गल्लीतच मुख्य रस्त्यावर तसेच आतील बाजूस मच्छी विक्रेते व्यवसाय करीत आहेत, हा मार्ग रेवदंडा समुद्रकिनारी जातो. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांची वाहने जाण्यास येथे अडथळा निर्माण होतो. रस्ता अरूंद असल्याने एकाच वेळी दोन्ही बाजूने मोठी वाहने आल्यास अनेक वेळा वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे पर्यटकांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.



### मच्छीमार्केट नियोजनशून्य

**रेवदंड्यात बांधण्यात आलेले मच्छीमार्केटचे नियोजन सुयोग्य नसल्याची तक्रार मच्छी विक्रेते करीत आहेत. त्यामुळे हे मच्छी विक्रेते हायस्कूलनजीकच्या मुख्य रस्त्यावर तसेच आतील गल्लीत व्यवसायासाठी ठाण मांडतात. या ठिकाणी मच्छी विक्रेते व ग्राहक यांची गर्दी नित्याने असते. येथून पर्यटक अथवा स्थानिकाच्या चारचाकी वाहने जा-ये करताना, नित्याने वाहतूक कोंडी होते.**

# पालीमध्ये खड्डे व धुळीचे साम्राज्य

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरातील रस्त्यांची पूर्णतः दूरवस्था झाली झाली आहे. यामुळे पाली शहरात सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्याचा नाहक त्रास वाहनचालकांना, भाविक तसेच रस्ता परिसरातील दुकानदार, व्यावसायिकांना सहन करावा लागत आहे. याबाबत उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.



**भाविक, व्यावसायिक आणि वाहनचालक हैराण**

पाली हे अष्टविनायक तीर्थ क्षेत्रातील एक देवस्थान असल्यामुळे रोज हजारो भाविक श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येथे येतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा असते, तसेच इतर वाहतूकही पाली हद्दीत रोज मोठ्या प्रमाणात होते. ही वाहने खड्ड्यात आपटतात व प्रचंड धुळीचे साम्राज्य निर्माण होत आहे. या धुळीमुळे श्वसनाचे रोग खोकला, दमा, घसाबतसेच डोळ्याचे विकार होत आहेत. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रस्त्यालगत असलेल्या छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे धुळीमुळे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे नगरपंचायतीने रस्त्यावर रोजच्या रोज दिवसातून दोन वेळा पाणी मारून धुळीचे साम्राज्य कमी करून पालीतील जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

### धुळीवर पाण्याचा उतारा

***वारंवार धुरळा उडवून तो रस्त्याशेजारील घरे व दुकानात जातो. यावर उपाय म्हणून काही रहिवासी व व्यापारी रस्त्यावर वारंवार पाणी मारतात, मात्र त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो, तसेच उन्हाने पुन्हा रस्ता कोरडा झाल्यावर धुरळा पुन्हा उडतो.***

# मुरूडमध्ये पर्यटकांची गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुडमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल झाले असून मासळी मार्केट रस्ता व राजपुरी येथील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. येथील प्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावरसुद्धा मोठी गर्दी झाली होती. समुद्रकिनारेही हाऊसफुल झाले होते. आलेले पर्यटक समुद्र स्नान, घोडागाडी, उंट सफारी करण्यात मग्न झाले होते.

हॉटेल, लॉजिंगमध्ये सर्व हाऊसफुल असल्याने पर्यटकांना रूम शोधण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागत होती. गेल्या दोन- अडिच वर्षांपासून कोरोनामुळे व्यवसाय ठप्प झाल्याने व्यावसायिक चिंतेत होते, मात्र आता खूप दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्यामुळे व्यावसायिक सुखावले आहेत.



# मजूर मिळत नसल्याने भातकापणीला उशीर



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात एकमेव भातपीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते, मात्र शेतमजूरांच्या कमतरतेमुळे आजही शेतीची कामे खोळंबली असून मजूरांची मनधरणी करून भातकापणीसाठी सुरुवात झाल्याचे तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे.

दिवसेंदिवस वातावरणात उष्णतेच्या प्रमाण वाढत असल्यामुळे भाताच्या लोंब्यांपासून भाताचे दाणे अलग होत असल्यामुळे यावर्षी पीक उत्तम आले. बळीराजा निसर्गाच्या लहरीपणावर मात करून भातपीक जोमाने वाढवून धान्य निर्माण करीत आहे, परंतु स्थानिक शेतमजुरांची दिवसेंदिवस कमी होत असलेली संख्या यामुळे शेतमजूरांचा तुटवडा जाणवत आहे.

पंचक्रोशी भागातून येणारे मजूर हे दिवाळीपूर्वी मिळतात. जे उपलब्ध होतील त्यांची मनधरणी करून लवकरात लवकर भातकापणीला आटोपून घेण्याचा प्रयत्न शेतकरीवर्ग करीत आहे. दिवसभरातील कडक उन्हामुळे शेतमजूर हैराण होत असल्यामुळे या भातकापणीकडे पाठ फिरवत आहे. त्यातच भातामधील तांदुळाचे दाणा टणक बनून तुटण्याची शक्यता अधिक असल्याने ठराविक वेळेत भातकापणीला झाली नाही, तर शेतकऱ्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागणार आहे. काही ठिकाणी भातझोडणीला प्रारंभ झालेला आहे. भातझोडणीसाठी शेतकरी वर्ग मजूर शोधून शेतीची कामे अंतिम टप्प्यात नेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# ग्रामीण भागात फिरता दवाखाना ठरतोय आधार



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील खानाव ते बेलोशी परिसरात मोठ्या प्रमाणात आदिवासी, ठाकूर समाज आहे. येथील रुग्णांना तालुक्याच्या ठिकाणी उपचारासाठी यावे लागत आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होतो. त्यामुळे गेल कंपनीच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या फिरत्या दवाखान्यामुळे आता मोफत उपचार घरोघरी केला जात आहे.

गेल इंडिया लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून रुग्णवाहिकेच्याद्वारे सुरू करण्यात आलेला फिरता दवाखाना खानाव, धसाडे कुणे, वेलवली खानाव, कंटक कुणे, उसर, नाईक कुणे, मल्याण, बेलोशी, वावे, घोटवडे, मल्याण या गावांमध्ये फिरणार आहे. येथील हजारो नागरिकांवरील आजारांवर प्राथमिक उपचार करून त्यांचे आरोग्य चांगले ठेवण्याचा प्रयत्न गेल कंपनीच्या माध्यमातून करण्यात आला आहे. अलिबाग तालुक्यातील बेलोशी गावात फिरता दवाखान्याची रुग्णवाहिका शनिवारी दाखल झाली. या वेळी गेल (इंडिया) लिमिटेडने कंपनीच्या सीईआर, सीएसआर कार्यक्रमांतर्गत चांगल्या आरोग्याची सामाजिक जबाबदारी म्हणून या प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावांतील लोकांना मोफत मूलभूत आरोग्य सेवांसह वोक्हार्ट फाउंडेशनची मोबाईल क्लिनिक रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. या रुग्णवाहिकेत एक डॉक्टर, एक नर्स, एक फार्मासिस्ट आणि औषधांची सुविधा उपलब्ध झाली आहे.

**गरीब, गरजूंना चांगली सुविधा मिळावी हा उद्देश समोर ठेवून कंपनीने फिरता दवाखाना खानावसह बेलोशीमध्ये सुरू केला आहे. अन्य गावांमध्येदेखील आठवड्यातील वारानुसार हा फिरता दवाखाना फिरणार आहे.**

**-जितीन सक्सेना, महाव्यवस्थापक (मानव संसाधन), गेल इंडिया लिमिटेड, उसर**

# जय श्रीराम पतसंस्थेच्या अध्यक्षपदी दिलीप जोशी बिनविरोध

**मुरूड : प्रतिनिधी**

जय श्रीराम नागरी सह. पतसंस्थेच्या पंचवार्षिक संचालक मंडळाची निवडणूक सत्तासंघर्ष टाळून सहकार क्षेत्रात परस्पर सहकार्याचा परिचय देत बिनविरोध झाली. पतसंस्थेच्या अध्यक्षपदी दिलीप भास्कर जोशी तर उपाध्यक्ष पदी मेघराज सिताराम जाधव यांची निवड करण्यात आली.

संचालक म्हणून नांदगाव हायस्कूलचे माजी शिक्षक गणेश ठोसर, अशोक दिवेकर, बाळकृष्ण कासार, अ‍ॅड. मोहन तांबडकर, अ‍ॅड. संजय जोशी, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर, समीर उपाध्ये, सिद्धेश गद्रे, जयश्री जोशी, अश्विनी पाटील यांचा समावेश आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक अधिक्षक प्रमोद वाघमारे यांनी काम पाहिले. मुरूडसह नांदगाव व चेहेर येथे श्रीराम पतसंस्था २८ वर्षे कार्यरत असून जिल्हा कार्यक्षेत्राची अनुमती मिळाली आहे. सहकार क्षेत्रातली तालुक्यातील अग्रगण्य संस्थेकडे ४१ कोटींहून अधिक ठेवी आहेत, तसेच ऑडिट वर्ग अ कायम राखत सदस्यांना १२ टक्के लाभांश देत आहोत. सहकार क्षेत्रातली सर्व कौशल्ये आत्मसात करून संस्थेला उर्जितावस्था प्राप्त करून देण्याचा मनोदय नवनिर्वाचित अध्यक्ष दिलीप जोशी यांनी व्यक्त केला, तर आर्थिक स्थैर्यता लाभण्यासाठी नवनिर्वाचित संचालक मंडळानी भांडवल पर्याप्तता या विषयाकडे अधिक लक्ष देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरव्यवस्थापक संजय ठाकूर यांनी तर कार्यलक्षी संचालक प्रमोद उपाध्ये यांनी आभार प्रर्दशन केले.



# ग्रंथोत्सव पूर्वतयारी आढावा बैठक

## तरुणांसाठी विशेष सत्रांचे आयोजन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात १४ व १५ नोव्हेंबर रोजी डोंगरे वाचनालय सभागृह येथे होणाऱ्या ग्रंथोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्याकरिता जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. ४) बैठक झाली.

या वेळी सुप्रसिद्ध लेखक-साहित्यिक रविंद्र तांबोळी, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड जिल्हाध्यक्ष सुजाता पाटील, सदस्या तथा साहित्यिका श्रुती देसाई, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष नागेश कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वर्षीच्या ग्रंथोत्सवात आबालवृद्धांना मोठ्या संख्येने सहभागी करून घेण्यासाठी नावीन्यपूर्ण सत्र आयोजित करावेत, तरुणांसाठी विशेष सत्रांचे आयोजन करावे, ग्रंथोत्सवातील कार्यक्रमांच्या विषयांबाबत नागरिकांकडूनही सूचना मागवाव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितांना दिल्या, तसेच जास्तीत जास्त नागरिकांनी या ग्रंथोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार (मोबाईल क्र. ९४०४१०५००५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# प्रभू श्रीरामाच्या जयघोषाने पाली नगरी दुमदुमली

## ■ श्रीराम राज्य रथयात्रेचे जोरदार स्वागत

**पाली : प्रतिनिधी**

श्रीराम राज्य रथयात्रेचे पाली शहरात नुकतेच आगमन झाले होते. या रथयात्रेचे हिंदू जनजागृती, पालीकर व सुधागडवासियांनी जल्लोषात स्वागत केले. या वेळी प्रभू श्रीराम नामाचा जयघोष, फुलांचा वर्षाव करीत, भगवे झेंडे नाचविण्यात आले. उपस्थितांनी प्रभू श्रीराम व सीतामाईचे मनोभावे दर्शन घेतले.

संपूर्ण पाली शहरातून ही रथ यात्रा काढण्यात आली. या रथयात्रेच्या स्वागतासाठी हिंदू जनजागृती समितीने विशेष मेहनत घेतली. पाली अष्टविनायक श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन कोकणातील श्रीराम राज्य रथयात्रेचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी रथासोबत परागबुवा रामदासी व इतर संत आणि पदाधिकारी होते. ही दिग्विजय यात्रा काश्मीर ते कन्याकुमारी, आणि



पंजाब ते बांगलादेश अशी यात्रा भ्रमण करणार आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिराचे काम ५० टक्के झाले असून २०२४मध्ये भाविकांना या मंदिरात श्रीरामाचे दर्शन घेता येणार आहे, तसेच हिंदू राष्ट्र, राम राज्य प्रस्थापित होण्याकरिता ही राम राज्य रथ यात्रा काढण्यात आली आहे. असे परागबुवा रामदासी यांनी सांगितले.



## टी-२० विश्वचषकात सर्वांत मोठा उलटफेर

# नेदरलँडकडून द. आफ्रिकेचा पराभव

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत अनपेक्षित खेळ पाहायला मिळत आहे. सुपर १२ फेरीत रविवारी (दि. ६) झालेल्या सामन्यात दुबळ्या नेदरलँडच्या संघाने बलाढ्य दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले. नेदरलँडने द. आफ्रिकेला १५९ धावांचे लक्ष्य दिले होते. त्यानंतर नेदरलँडच्या गोलंदाजांनी अभूतपूर्व कामगिरी करीत आफ्रिकेला निर्धारित २० षटकांमध्ये आठ बाद १४५ धावांमध्ये रोखले आणि १३ धावांनी धक्कादायक विजय मिळविला.



दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून नेदरलँडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. प्रथम फलंदाजी करताना नेदरलँडने ४ बाद १५८ धावा केल्या. सलामीवीर स्टीफन मायबर्ग आणि मॅक्स ओ डाऊन यांनी सुरुवातीला चांगली फटकेबाजी केली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ५८ धावांची भागेदारी केली. त्यानंतर मार्करमने मायबर्गला ३७ धावांवर बाद करीत नेदरलँडला पहिला धक्का दिला. मॅक्स ओ डाऊन हादेखील २९ धावांवर बाद झाला, पण टॉम कूपने १९ चेंडूत ३५ धावा, तर कॉलिन एकरमॅन याने २६ चेंडूत ४१ धावा फटकावत नेदरलँडला १५८ एवढी सन्मानजनक धावसंख्या उभारून दिली. आफ्रिकेच्या केशव महाराज या गोलंदाजाने दोन विकेट घेतल्या.

१५९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना नेदरलँडच्या गोलंदाजीचा फटका दक्षिण आफ्रिकेला बसला. दक्षिण आफ्रिकेने वेळोवेळी विकेट्स गमावल्या. शेवटच्या षटकामध्ये सहा चेंडूमध्ये २६ धावा हव्या होत्या, मात्र दक्षिण आफ्रिकेच्या संघाला केवळ १२ धावा करता आल्या. या पराभवामुळे आफ्रिकेचे विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आले असून संघावरील चोकर्स हा शिक्काही आणखी गडद झाला आहे.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेच्या पराभवानंतर माजी खेळाडू ए. बी. डेव्हिलियर्सने ट्वीट करीत आपल्या खेळाडूंसाठी वाईट वाटत असल्याचे म्हटले आहे. त्याचप्रमाणे त्याने नेदरलँडस संघाने कौतुक केले आहे.

# पाकिस्तान सेमीफायनलमध्ये दाखल

## ■ बांगलादेशवर साकारला विजय

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

पाकिस्तानने बांगलादेशला हरवत टी-२० विश्वचषक स्पर्धेतील उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. पाकिस्तानने बांगलादेशला १२७ धावांमध्ये गुंडाळले आणि हे माफक लक्ष्य १८.१ षटकांत पाच गड्यांच्या मोबदल्यात पार केले.




बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होत्या. त्यांच्या लिट्टन दास व मजमुल होसैन शांतो यांनी दमदार सुरुवात केली. शाहिन आफ्रिदीला तिसऱ्या षटकात लिटन दासने मारलेला षटकात पाहण्यासारखा होता, पण त्याच षटकात पॉईंटच्या दिशेला फटका मारण्याचा प्रयत्नात लिट्टन (१०) शान मसूदच्या हाती झेल देऊन माघारी परतला. मोहम्मद वसीमच्या पुढच्या षटकात शादाब खानने बांगलादेशचा दुसरा सलामीवीर शांतोचा सोपा झेल टाकला. त्यानंतर शांतोने खणखणीत चौकार-षटकार खेचला. शांतो पाकिस्ताच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई करत होता. त्यामुळे बाबर आजम ॲण्ड ब्रिगेडचे मनोबल ढासळताना दिसत होते. शांतो आणि सौम्या सरकार यांनी दुसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करून पाकिस्तानची डोकेदुखी आणखी वाढवली. ११व्या षटकात शादाबने ही भागीदारी संपुष्टात आणली. रिव्हर्स स्वीप मारण्याच्या प्रयत्नात सौम्या (२०) झेलबाद झाला. पुढच्याच षटकात शादाबने बांगलादेशचा कर्णधार शाकिब अल हसनला पायचीत केले. वास्तविक डीआरएस घेतल्यानंतर शाकिब बाद नसल्याचे स्पष्ट दिसत होते, तरीही तिसऱ्या पंचांनी त्याला बाद दिले.

पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहिन आफ्रिदीने सर्वाधिक चार विकेट्स घेत बांगलादेशचे कंबरडे मोडले. पाकिस्तानला बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांनी ५७ धावांची सलामी दिली. त्यामुळे एक चांगली सुरुवात त्यांना विजयापर्यंत घेऊन गेली. अखेरच्या काही षटकांमध्ये पाकिस्तानला धक्के बसले होते, पण तोपर्यंत पाकिस्तानचा संघ हा सेमीफायनलमध्ये दाखल झाला होता.

# कुस्तीपटू सुशीलकुमारची सुटका

## न्यायालयाने केला जामीन मंजूर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

युवा कुस्तीपटू सागर धनकर याच्या हत्येप्रकरणी तिहार जेलमध्ये शिक्षा भोगत असलेल्या भारतीय ऑलिम्पिक पदकविजेता कुस्तीपटू सुशीलकुमारला जामीन मंजूर झाला असून त्याची तिहार जेलमधून सध्या सुटका झाली आहे. एएनआयने दिलेल्या माहितीनुसार सुशील कुमारची पत्नी आजारी असून तिच्यावर शस्त्रक्रिया होणार आहे, यामुळे न्यायालयाने सुशीलकुमारला जामीन मंजूर केला आहे. सागर हत्याकांडात सुशीलकुमारसह एकूण १८ आरोपींचा समावेश आहे.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश शिवाजी आनंद यांनी सुशीलकुमारला १२ नोव्हेंबरपर्यंत जामीन मंजूर केला आहे. जामीन मंजूर करताना न्यायालयाने अनेक अटीही ठेवल्या आहेत. सरकारी वकिलाने या जामिनास विरोध दर्शवला होता, मात्र परिस्थिती पाहून न्यायालयाने सुशीलकुमारला जामीन मंजूर केला.

# मुश्ताक अली क्रिकेट स्पर्धेत मुंबईला प्रथमच विजेतेपद

**कोलकाता : वृत्तसंस्था**

सर्फराज खान (३१ चेंडूत नाबाद ३६ धावा) आणि तनुष कोटियन (पाच चेंडूत ९ धावा) यांच्या निर्णायक खेळींमुळे अखेरच्या षटकापर्यंत गेलेल्या सय्यद मुश्ताक अली ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मुंबईने हिमाचल प्रदेशवर तीन गडी आणि तीन चेंडू राखून विजय मिळवत विजेतेपद पटकावले.




हिमाचल प्रदेशने दिलेल्या १४४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या मुंबईची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर पृथ्वी शॉ (११) आणि कर्णधार अजिंक्य राहणे (१) लवकर बाद झाल्याने संघ अडचणीत सापडला. यशस्वी जैस्वाल (२७) आणि श्रेयस अय्यर (३६) यांनी चांगले फटके मारत संघाच्या धावसंख्येत भर घातली, मात्र हे दोघे माघारी परतल्याने मुंबईची अवस्था ही ४ बाद ९६ अशी बिकट झाली. शिवम दुबे (७) आणि अमन खान (६) जास्त काही करू शकले नाही. सर्फराजवर संघासाठी धावा करण्याची जबाबदारी होती. त्याने संघाची एक बाजू सांभाळत धावसंख्येत भर घातली. अखेर कोटियनने षटकार मारत १९.३ षटकांत संघाला ७ बाद १४६ धावसंख्येपर्यंत पोहचवत विजय मिळवून दिला. हिमाचल प्रदेशकडून वैभव अरोरा (३/२७) आणि ऋषी धवन (२/२६) यांनी चांगली गोलंदाजी केली.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजीस उतरलेल्या हिमाचल प्रदेशने एकांत सेन (३७), आकाश वसिष्ठ (२५) आणि मयांक डागर (नाबाद २१) यांच्या फलंदाजीच्या बळावर २० षटकांत ८ बाद १४३ धावा केल्या. मुंबईकडून मोहित अवस्थी (३/२१) आणि तनुष कोटियन (३/१५) यांनी गोलंदाजीत चुणूक दाखवली.

**संक्षिप्त धावफलक**

हिमाचल प्रदेश : २० षटकांत ८ बाद १४३ (एकांत सेन ३७, आकाश वसिष्ठ २५; तनुष कोटियन ३/१५) पराभूत वि. मुंबई : १९.३ षटकांत ७ बाद १४६ (सर्फराज खान नाबाद ३६, श्रेयस अय्यर ३४; वैभव अरोरा ३/२७)

# श्रीलंकेचा खेळाडू दनुष्का गुणथिलकाला अटक

## ■ बलात्काराचा आरोप; टी-२० विश्वचषकात खळबळ

**सिडनी : वृत्तसंस्था**

श्रीलंकेचा आघाडीचा फलंदाज दनुष्का गुणतिलकाला बलात्काराच्या प्रकरणात सिडनी पोलिसांनी अटक केली आहे. श्रीलंकेच्या टीमने शनिवारी इंग्लंडविरोधात वर्ल्डकपमधील अखेरचा सामना खेळला होता. या सामन्यानंतर काही वेळातच पोलिसांनी गुणतिलकाला अटक केली. त्यामुळे ल्याने टी-२० वर्ल्डकपमध्ये खळबळ उडाली आहे.

३१ वर्षांच्या दनुष्काने ऑस्ट्रेलियातील २९ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. या महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. अटक टाळण्यासाठी दनुष्काने जामिनाचा अर्ज दाखल केला होता, पण कोर्टाने जामीन नाकारला.

या प्रकरणी पोलिसांनी दिलेली माहित अशी, दनुष्का आणि या महिलेची ओळख एका ऑनलाइन डेटींग ॲपवर झाली. या दोघांनी एका हॉटेलमध्ये भेटायचे ठरवले. २ नोव्हेंबर रोजी त्याने या महिलेला हॉटेलमधील एका रूममध्ये भेटायला बोलवले आणि तिथे जबरदस्ती बलात्कार केल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे.

पोलिसांनी तपासानंतर दनुष्काला अटक केली आहे. तपासादरम्यान, पोलिसांनी सीसीटीव्ही तपासले आहेत. सिडनी येथील ससेक्स स्ट्रीट हॉटेलमधून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी दनुष्काला कस्टडीमध्ये ठेवले आहे.

# अर्शदीपने पारस म्हांब्रेला दिले कामगिरीचे श्रेय

**मुंबई : प्रतिनिधी**



ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचा गोलंदाज अर्शदीप सिंग उत्तम कामगिरी करीत आहे. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातही अर्शदीपने केलेल्या गोलंदाजीचे कौतुक करण्यात आले. २३ वर्षीय अर्शदीपने टी-२० विश्वचषकातील चार सामन्यांमध्ये नऊ विकेट्स घेतल्या आहे. यात पाकिस्तानविरुद्ध ३२ धावांवर तीन विकेट्स ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. त्याने आपल्या यशस्वी कामगिरीचे श्रेय भारतीय संघाचे गोलंदाजीचे प्रशिक्षक पारस म्हांब्रे यांना दिले आहे.

'स्टार स्पोर्ट्स'शी अर्शदीप म्हणाला, मी सातत्य ठेवण्यावर लक्ष देत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना तुम्ही सामान्य गोलंदाजी करण्याच्या स्थितीत नसता, पण चेंडू नवा असो किंवा जुना मला चांगलीच कामगिरी करायची आहे. गरजेनुसार मला विकेट्सही घ्यायच्या आहेत आणि आवश्यक असेल तिथे धावसंख्येवर अंकुशही लावायचाय.

पारस म्हांब्रे यांनी (भारतीय संघाचे गोलंदाजीचे प्रशिक्षक) माझ्या गोलंदाजीसाठी रनअपवर काम केलेय. मी जर सरळ रनअप घेतला तर लाईनमध्ये सातत्य राहिल. ऑस्ट्रेलियाच्या पिचवर खराब लाईन लेंथसह तुम्ही गोलंदाजी करू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केलेय. यासाठीच मी सरळ रेषेत रनअप घेण्याचा प्रयत्न करतोय आणि त्याचे परिणामही मला दिसून येत आहेत. मी यापेक्षाही चांगली कामगिरी करेन अशी अपेक्षा करतोय.

अर्शदीपला यादरम्यान तू लेंथवर काय काम करीत आहेस असाही सवाल करण्यात आला. त्यावर त्याने आम्ही जवळपास एक आठवडा आधी पर्थमध्ये पोहचलो आणि आपल्या लेंथवर काम सुरू केल्याचे सांगितले.

सरावादरम्यान पिचवरील चेंडूची उसळी पाहत योग्य लेंथ ओळखण्यात यशस्वी झालो. आम्ही योग्य तयारीनिशी उत्तम कामगिरी केली आहे, असेही अर्शदीपने सांगितले.





**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी घनदाट जंगल प्रकल्प उभारून वनीकरणाला चालना देण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा प्रारंभ रविवारी शहरातील लक्ष्मी आय चॅरिटेबल हॉस्पिटलशेजारील नियोजित जागी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. रोटरी घनदाट जंगल प्रकल्प अंतर्गत दोन हजार रुपये देणगी मूल्य देऊन आपल्या स्वतःच्या नावाने किंवा आप्तस्वकीयांच्या नावाने स्मृतीप्रित्यर्थ वृक्षारोपणाचा हा उपक्रम राबविण्यात आला.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगु ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com